मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शनिवार, १९ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१२१ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## पाणीपुरी खाल्ल्याने 30 विद्यार्थ्यांना विषबाधा

**नांदेड, दि. १८ प्रतिनिधी**

नांदेड शहरालगत असलेल्या विष्णुपुरी परिसरातील एका पाणीपुरीच्या ठेल्यावर पाणीपुरी खाल्ल्याने तब्बल ३० ते ३२ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा प्रकार उघडकीस आला. सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालयातून सांगण्यात आले. विष्णुपुरी या परिसराची ओळख शैक्षणिक केंद्र म्हणून आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागांतील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी राहतात. या भागात छोटे-मोठी हॉटेल, खानावळ, वेगवेगळे चाट भांडार, तसेच अनेक उपाहारगृह आहेत. काल, बुधवारी काही विद्यार्थ्यांनी एका पाणीपुरीच्या ठेल्यावर पाणीपुरीचा आस्वाद घेतला. पण काही वेळाने त्यांना उल्टी व जुलाबाचा त्रास सुरू झाला. सहकारी विद्यार्थ्यांच्या मदतीने या सगळ्यांना विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अग्राग्रलेख
**खरीखरी**

## सर्वोच्च न्यायालयाचे भूषण

परवा अमरावतीतून विमानाचे उड्डाण सुरू झाले. काल देशाच्या सरन्यायाधीश पदावर उड्डाण केले. आता नागपूर आणि मुंबईत अनेक वर्ष वकिली करणाऱ्या विदर्भ पुत्राला आता देशातील सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यपद माझेच सरन्यायाधीश पद मिळालेले आहे. सध्याचे सरन्यायाधीश खन्ना साहेब आहेत. ते १३ तारखेला पदमुक्त होणार आणि त्यानंतर देशाचे ५२ वे सरन्यायाधीश भूषण गवई होणार आहेत. या पदावर नागपूरचे तिसरे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांचे नाव आता इतिहासात लिहिण्यात आलेले आहे. नागपूरचे पहिले सरन्यायाधीश हिदायत्तुला उपराष्ट्रपती झाले होते. दुसरे न्यायमूर्ती बोबडे आणि आता थेट नागपुरात वकीली केलेले अमरावतीचे सुपुत्र गवई साहेब पुढील जवळ जवळ सात महिने या पदावर राहतील. आपल्या महाराष्ट्रातील आरपीआयचे मोठे नेते रा. सू. गवई आणि डॉक्टर कमलताई गवई यांचे हे सुपुत्र आहेत. रा. सू. गवई आपल्या पक्षाचे एकमेव आमदार होते. पण त्यांना विधान परिषदेचे उपसभापती व त्यानंतर सभापती म्हणून बिनविरोध निवडले गेले होते. हे कुटुंब जरी राजकारणात असले. तरी न्यायमूर्ती गवई म्हणजेच भूषण गवई एक अभ्यासू व्यक्ती म्हणून गणले जातात. त्यांचा जन्म अमरावतीचा आहे. कायद्याची पदवी त्यांनी मुंबई विद्यापीठातून मिळवली. चाळीस वर्षांपूर्वी ज्यांनी बॅरिस्टर राजा भोसले यांना गुरुस्थानी मानून मुंबईत वकिली सुरू केली. त्या भूषण गवई यांची अभ्यासूवृत्ती आणि कायद्याचे जबरदस्त ज्ञान यामुळे ते मुंबईत चांगलेच लोकप्रिय झाले. आपल्या वकिलीच्या काळात वंचित आणि उपेक्षितांचा जिव्हाळा त्यांनी अगदी काटेकोरपणे जपला. वीस वर्ष मुंबई आणि नागपूर येथे वकिली केल्यावर २००५ साली त्यांना उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी महाराष्ट्रातील ज्या ज्या ठिकाणी उच्च न्यायालयाचे बेंच होते. त्या प्रत्येक ठिकाणी न्यायदानाचे काम केलेले आहे. जवळपास पंधरा वर्षे मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश पद सांभाळल्यावर २०१९ साली त्यांना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून बढती मिळालेली आहे. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम ज्या घटनापीठाने मंजूर केले. त्यात गवई यांचाही वाटा आहे. तत्पूर्वी रात्री आठ वाजता अचानक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटबंदी जाहीर केली होती. त्याला वैध ठरवण्याचा निर्णय देणारे न्यायमूर्ती गवईच होते. त्यासोबत इतरही अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी दिलेले आहेत. या आपल्या देशातील लोकशाहीला ललामभूत ठरेल अशी त्यांची कारकीर्द आहे. त्यांच्या सरन्यायाधीश पदाचा योग आता आल्यामुळे त्यांचे शहर अमरावती सध्या अतिशय आनंदाच्या उड्डाणात दंग आहे. न्यायमूर्ती भूषण गवळी यांचा कार्यकाल तसे पाहिले. तर काही महिनेच म्हणजे अवघे सात-साडेसात महिने आहे. पण हा कालखंड अतिशय संवेदनशील मुद्द्यांवर निर्णय देण्याचा राहणार आहे. आता त्यांच्या निस्पृहते बाबत म्हणजेच पारदर्शकपणा बाबतही सांगायलाच हवे. त्यांची पारदर्शक निस्पृहता अशी होती की, राहुल गांधी यांना गुजरातच्या छोट्या म्हणजेच जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर हे प्रकरण ज्यांच्या समोर आले. ते हेच गवई साहेब होते. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, माझे कुटुंब काँग्रेसचे सहप्रवासी होते. 'तुम्हाला काही हरकत असेल तर यातून मी बाहेर पडतो'. परंतु प्रतिपक्षाने त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकला आणि त्यांनी कायद्याच्या आधारे राहुल गांधींची शिक्षा रद्द करून टाकली. अशा प्रकारे सर्वसमावेशी आणि आपल्या पदाला न्याय देणारे म्हणून भूषण गवई न्यायालयीन वर्तुळात मानाचे स्थान मिळवून आहेत. यात कोणतेही दुमत नाही. त्यांच्या छोट्याशा कारकिर्दीत ते आपला सर्वसमावेशी विचार जागृत ठेवून न्याय देतील. त्यासोबतच सर्वांमध्येच लोकप्रिय असलेल्या आणि राज्यपाल पदावर आरुढ झालेल्या आपल्या वडिलांप्रमाणेच आपले नाव न्यायदानाच्या परिघामध्ये यशस्वी करतील यात शंकाच नाही. त्यासाठीच त्यांना नागपूर, अमरावती, विदर्भ आणि संपूर्ण महाराष्ट्राकडून कोटी कोटी शुभेच्छा!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023



# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, समृद्धी महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

मुंबईतील सर्व टोल नाक्यांवरून छोट्या वाहनांना टोलमुक्ती मिळाल्यानंतर आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरून धावणाऱ्या सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी मिळणार आहे. त्यामुळे महामार्गावरून इलेक्ट्रिक वाहनांचा प्रवास सुसाट होणार आहे.

१ मे पासून या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून सरकारकडून 'महाराष्ट्र दिनाची' भेट ठरणार आहे. मात्र, या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवर १०० कोटींचा भार पडणार आहे.

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य सरकारने सर्व सरकारी वाहने इलेक्ट्रिक करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार डिझेल, पेट्रोल गाड्यांची जागा इलेक्ट्रिक वाहने घेणार आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी एक व्यापक इलेक्ट्रिक वाहन धोरण महायुती सरकार राबवत आहे. यामध्ये 'ईव्ही'चा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहने, पायाभूत सुविधा विकास आणि नियामक उपाययोजनांचा समावेश आहे.

देशभरात इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीने गती घेतली असली तरीही एकूण वाहन विक्रीपैकी फक्त ६-७ टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत. त्यामध्ये देखील दिल्ली (१२ टक्के), कर्नाटक (९-१० टक्के) आणि तामिळनाडू (८ टक्के) यासारख्या राज्यांनी प्रागतिक धोरणे व पायाभूत सुविधांच्या विकासाच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहनांच्या अधिक प्रमाणावरील स्वीकारार्हतेला चालना दिली आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्यात एकूण वाहन विक्री पैकी फक्त ५ ते ६ टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत.

महायुती सरकारने २०२५पर्यंत प्रमुख शहरांमध्ये नवीन नोंदणीकृत वाहनांपैकी १० टक्के वाहने इलेक्ट्रिक असावीत, असे लक्ष्य ठेवून सुधारित 'ईव्ही' धोरण आणत आहे. राज्यात सद्य:स्थितीत १ जानेवारी २०२५ पर्यंत ४ कोटी ८८ लाख वाहने असून त्यापैकी ६ लाख ४४ हजार ७७९ वाहने ही इलेक्ट्रिकवर धावणारी आहेत.

'ईव्ही' गाड्यांना टोलमाफी देण्याच्या प्रस्तावामुळे सरकारच्या तिजोरीवर १०० कोटींचा भार पडणार आहे. त्यामुळे या प्रस्तावाला वित्त विभागाने विरोध केला तरी 'ईव्ही' गाड्यांच्या उत्पादनाला चालना मिळावी आणि अधिकाधिक पर्यावरणपूरक गाड्यांचा जास्तीत जास्त वापर वाढावा यासाठी हा भार परिवहन विभाग पेलणार आहे, असेही समजते.

**दर २५ कि.मी. अंतरावर चार्जिंग स्टेशन**


'ईव्ही'चा वापर वाढविण्यासाठी महामार्गावर चारचाकी, बसेस व ट्रकसाठी उच्च दाबाच्या चार्जिंगची सुविधा असणारे स्टेशन २५ कि.मी. अंतरावर असणार आहे. दरम्यान, राज्यात उभारण्यात येणाऱ्या एकूण चार्जिंग स्टेशनपैकी १० टक्के स्टेशन ही यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर उभारली जातील; तर उर्वरित स्टेशन राज्याच्या इतर भागात व राष्ट्रीय महामार्गावर प्राधान्याने उभारण्यात येणार आहेत.

## बीडमध्ये महिला वकिलाला मारहाण

**बीड, दि.१८ प्रतिनिधी**

बीड जिल्हा गेल्या काही महिन्यांपासून वाईट कारणांमुळे चर्चेत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या निर्घृण हत्येच्या घटनेनंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीच्या घटना सातत्याने उघडकीस येत आहेत. डीजेच्या आवाजाचा त्रास होत असल्याची तक्रार केल्यामुळे एका महिला वकिलाला गावच्या सरपंचाने कार्यकर्त्यांसोबत मिळून बेदम मारहाण केल्याची घटना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात घडली. लाठ्या काठ्या आणि पाईपच्या मदतीने ही मारहाण झाल्याचे आरोप करण्यात येत आहेत. घडलेल्या प्रकाराचे फोटोही व्हायरल झाले असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

"बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे सत्र न्यायालयात वकीली करणाऱ्या एका महिलेला गावातील ध्वनीप्रदूषणाविरोधात कार्यालयीन तक्रार केल्याच्या कारणावरून सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतात नेऊन बेदम मारहाण केली. काठ्या आणि लोखंडी पाइप वापरून झालेल्या हल्ल्यामुळे ती महिला बेशुद्ध पडली, आणि नंतर तिला केवळ एका रात्रीत रुग्णालयातून घरी पाठवण्यात आले. हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे आणि महिलांच्या सुरक्षिततेबाबत सरकारच्या अपयशाची साक्ष देतो. एक वकील असलेल्या महिलेला जर संरक्षण नसेल, तर सामान्य महिलांचे काय? महाराष्ट्राला पूर्णवेळ गृहमंत्री असेल तर प्रशासनाने तात्काळ दोषींवर गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करावी तसेच त्यांना कठोर शासन करा," असे आव्हान हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारला दिले आहे.



शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसेंनीही ट्विट करत राग व्यक्त केला. "मुख्यमंत्री महोदय हे फोटो पहा आणि तुम्हाला झोप कशी लागते ते सांगा? डीजेच्या आवाजाचा त्रास होत असल्याने त्याची तक्रार केल्याने एका महिला वकिलाला गावच्या सरपंचाने कार्यकर्त्यांसोबत मिळून बेदम मारहाण केल्याची घटना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील एका गावात घडली आहे. लाठ्या काठ्या आणि पाईपच्या मदतीने केलेल्या या महाराहाणीत महिला वकील जबर जखमी झाल्या आहेत. वकील असलेल्या महिलेला जर मारहाण होत असेल तर या राज्यात कायद्याचा धाक किती आहे हे दिसून येते. या घटनेमुळे महाराष्ट्र आता बिहारच्याही पुढे गेलाय असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे," असे म्हणत त्यांनी गृहमंत्रालयाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार मायग्रेनचा त्रास होत असल्याने आपल्या घरासमोरील लाऊड स्पीकर आणि पीठाची गिरण हटवण्यात यावी, अशी मागणी करत महिला वकिलाने तक्रार दाखल केली होती. त्यामुळे संतप्त झालेले गावचे सरपंच आणि त्यांच्या काही कार्यकर्त्यांनी महिला वकिलाला शेतामध्ये घेराव घालून अडवले. तिला लाठ्या-काठ्या आणि पाईपच्या मदतीने बेदम मारहाण केली. त्या महिला वकिलाला केलेल्या मारहाणीचे फोटो सध्या सोशल मीडियावर वाऱ्याच्या वेगान व्हायरल होत आहेत. या मारहाणीत जबर जखमी झालेल्या महिला वकिलाला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि उपचारानंतर घरी पाठवण्यात आले.

## बिहार इलेक्शन येत आहे तुम्ही हिंदी घ्या, आम्ही मराठीची बाजू घेतो- आदित्य ठाकरे

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

राज्य सरकारने शालेय शिक्षण विभागासाठी यंदाच्या वर्षीपासून नवीन सीबीएसई धोरण अवलंबलं आहे. त्याचाच एक भाग म्हणून इयत्ता पहिलीच्या वर्गापासून विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, आता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना तीन भाषांचे ओझे नको म्हणून या निर्णयाला विरोध होत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्वच्छ शब्दात या निर्णयाला विरोध केला असून आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही, असे म्हणत मराठी भाषेतच शालेय शिक्षण देण्याचा आग्रह त्यांनी केलाय. तर दुसरीकडे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी या निर्णयावर ठाम असल्याचे सांगत हिंदी ही आपली राष्ट्रभाषा असल्याचे म्हटले. आता, शिवसेना युबीटी आमदार आदित्य ठाकरे यांनीही भाषेच्या मुद्द्यावरुन आपली भूमिका स्पष्ट केली.

राजकारण बघायचे असेल तर योगायोग बघा, परवा भेटीगाठी झाल्या, पाठिंबा, विरोधाची चर्चा झाली. कदाचित बिहार इलेक्शन येणार आहेत, यात तुम्ही हिंदी भाषा घ्या आणि आम्ही मराठीची बाजू घेतो असे काहीतरी झाले असेल, असा राजकीय कयास बांधून राज ठाकरेंच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. जेवढ्या भाषा तुम्हाला येतील तितकी तुमची प्रगती होते, युपीएससीमध्ये पण स्थानिक भाषा बोलणारे असतात. आपली आताची जी शिक्षण पद्धती आहे, त्यात मुंबई महापालिकेत मराठी, हिंदी, इंग्लिश, अशा अनेक भाषा शिकवतो, पण त्यात मराठी सक्तीची होती. पहिली पासून शिकवताना तीन भाषा ही मुलांवर जरा जास्त सक्ती आहे असे वाटत नाही का? त्यापेक्षा हळू हळू ती शिकवायला सुरुवात करावी, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. ज्यांनी हे परिपत्रक काढले आहे, त्या मंत्री महोदयांना देखील एक तरी भाषा व्यवस्थित येते का? असा टोला आदित्य ठाकरेंनी मंत्री दादा भुसे यांना लगावला. मी कोणाची टिंगल करत नाही, पण तुम्ही गणवेश देऊ शकत नाहीत आणि तिसरी भाषा सक्तीची करणार आहात. अनेक ठिकाणी एकच शिक्षक असतात, त्या शिक्षकांवर किती भार पडणार हे लक्षात ठेवा. देशात आपण धर्मावर भांडत आहोत, जातीवर आणि आता शिक्षणात भाषा कोणती यावर भांडत आहोत, हे सगळं केंद्र सरकारमुळे झाले आहे. जोपर्यंत ही पद्धत आपण बदलत नाही तोपर्यंत कठीण आहे. माझा भाषेला विरोध नाही. मात्र, ती कशी एक-एक करून शिकवता येईल याचा विचार करायला हवा, अशा शब्दात आदित्य यांनी आपली भूमिका मांडली आहे.

महाराष्ट्रात आता पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषा शिकवणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २०२४ राज्य शालेय आराखड्याद्वारे तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार हा निर्णय घेण्यात आला असला तरी याला जोरदार विरोध होत असताना पाहायला मिळतो आहे. मुंबईच्या घाटकोपर विभागात मनसेच्यावतीने आड हिंदी भाषेची शैक्षणिक पुस्तक जाळून याचा निषेध करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मनसेचे सचिव अभिषेक सावंत यांना पोलिसांनी पुस्तके जाळताना ताब्यात घेतले. हिंदी सक्तीचा निर्णय आम्हाला मान्य नाही , पोलिसांनी आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला असला तरी आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मनसेनं दिला आहे.

## छत्तीसगडमधील सुकमा येथे 22 नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**रायपूर, दि. १८ वृत्तसंस्था**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात एका नक्षल दाम्पत्यासह एकूण २२ नक्षल्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केल्याचे समोर आले आहे. शासनाच्या नक्षल सदस्य मुक्त ग्राम पंचायत अंतर्गत २२ नक्षल्यांना आत्मसमर्पण करविण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.

आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांवर एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते. आत्मसमर्पित १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ८-८ लाख, १ पुरूष व १ महिला नक्सलीवर ५-५ लाख, २ पुरूष व ५ महिला २-२ लाख, १ पुरूष नक्सल वर ५० हजार असे एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित होते.


नक्षल्यांना आत्मससमर्पणासाठी डीआरजी सुकमा, रेंज फिल्ड टीम (आरएफटी) कोंटा, सुकमा, जददलपूर सीआरपीएफ व कोबरा यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आत्मसमर्पित नक्षल्यांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल होते.

## तटकरेंसाठी खास 4 हेलिपॅड का ? अंजली दमानियांचा सवाल

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकताच रायगड दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी किल्ले रायगड भेटीबरोबरच अजित पवार यांच्या काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या घरीदेखील स्नेहभोजनासाठी भेट दिली. दरम्यान, महाराष्ट्र शासनाकडून गृहमंत्र्यांच्या स्वागतासाठी रायगडमध्ये ४ हेलिपॅड उभारण्यात आली. यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राज्य सरकारला धारेवर धरले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शहा यांच्या दौऱ्यापूर्वी रायगडमध्ये हेलिपॅड उभारणीसंदर्भातील निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी महाराष्ट्र शासन, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना लक्ष्य केले आहे. दमानिया यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, "जनतेच्या कष्टाने कमवलेल्या करायच्या पैशातून तटकरेंसाठी खास HELIPAD? ती




पण चार चार Helipad?..."

पुढे दमानिया यांनी "गृहमंत्री अमित शहा यांची भेट वैयक्तिक होती तर त्याचा भार सरकारी तिजोरीवर कशासाठी? अमित शह यांना जेवायला घालायचय, खुशाल घाला... सोन्याच्या ताटात घालायचंय तरी घाला.... पण ते आमच्या कष्टाच्या पैशाने कशासाठी? असे प्रश्न उपस्थित केले आहेत. तटकरेंच्या अफाट कंपन्या आहेत ना ? मग त्यांनी वैयक्तिक खर्च करावा... देवेंद्र फडणवीसांचे पुनःश्च अभिनंदन. सिंचन घोटाळा विसरून नवीन सरकारमधे खूपच चांगला ताळमेळ जाणवतोय, असा टोलादेखील सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी लगावला आहे.

## अपघातग्रस्तांवर एक लाखांपर्यंत कॅशलेस उपचार करा; आरोग्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार करा, असे निर्देश राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिले. जन आरोग्य योजनेच्या आढावा बैठकीत मंत्री आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना या संदर्भातील सूचना दिल्या.



अपघातग्रस्तांना तातडीने उपचार देण्यासाठी अंगीकृत आणि अन्य रुग्णालयांनी, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असेदेखील आरोग्यमंत्री आबिटकर यांनी म्हटले. पुढे त्यांनी रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी रुग्णालये, संस्थांनी दक्षता बाळगावी. गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र 'मोबाईल ॲप' विकसित करण्याचा निर्णयदेखील यावेळी घेण्यात आला.

कर्करोग संशयित, निदान झालेल्या व उपचारासाठी दाखल रुग्णांची तपशीलवार यादी ठेवावी. त्यांच्या दररोजच्या तपासण्यांची माहिती अचूकपणे भरावी. जिल्हास्तरावर अधिकारी व उपसंचालक यांनी अधिनस्त संस्थांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, असे निर्देशदेखील आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, संस्थांनी दक्षता बाळगावी. गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र 'मोबाईल ॲप' विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## मुंडेंच्या आमदारकीविरुद्ध न्यायालयात जाणार- देशमुख





**बीड, दि. १८ प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात गेल्या 4 महिन्यांपासून बीड जिल्हा केंद्रस्थानी आहे. अगोदर विधानसभा निवडणुकांमध्ये आमदार धनजंय मुडेंच्या निकटवर्तीयांकडून झालेल्या गुंडगिरीमुळे शरद पवारांच्या राष्ट्रवादीने गंभीर आरोप केले होते. त्यानंतर, सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्यात तीव्र संतापाची लाट उसळल्यानंतर धनजंय मुडेंना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले. आता, बीडमधील निलंबित पोलीस निरीक्षक रणजीत कासले यांनी धनंजय मुडेंवर गंभीर आरोप केले आहेत. तसेच, त्यांच्या माणसांकडून माझ्या बँक अकाऊंटवर १० लाख रुपये टाकण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्यावरुन, आता परळी मतदारसंघातील शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार विधानसभा उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी न्यायालयात दाद मागणार असल्याचे म्हटले. तसेच, एकट्या रणजीत कासलेला १०लाख दिले असतील तर बाकीच्यांना किती दिले, असा सवालही देशमुख यांनी विचारला आहे.

रणजीत कासले यांना धनंजय मुंडे यांनी ईव्हीएमपासून दूर जाण्यासाठी दहा लाख रुपये दिल्याच कासले यांनी म्हटले होते. त्यावर परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी परळी मतदारसंघात कशा पद्धतीने प्रशासनाचा गैरवापर झाला, याची स्पष्टता दिली आहे. एकट्या कासलेला दहा लाख रुपये दिले तर इतरांना किती रुपये वाटले? असतील असा सवाल करत परळी विधानसभा मतदारसंघात प्रशासनाचा कशा रितीने गैरवापर झाला हे समोर येत अल्याचे राजेसाहेब देशमुख यांनी म्हटले. आता या सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी न्यायालयात जाणार असल्याचे देखील देशमुख यांनी सांगितले.

परळी मतदारसंघात विधानसभा निवडणुकीनिमित्त धनंजय मुंडे आणि राजेसाहेब देशमुख एकमेकांविरोधात उभे ठाकले होते. मात्र, या निवडणुकीत शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. आता, कासले यांच्या आरोपानंतर देशमुख पुढे आले असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी ते न्यायालयात धाव घेणार आहेत. तर, यापूर्वीच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंच्या निवडीविरुद्ध न्यायालयात दाद मागितली आहे.

विधानसभा निवडणुकांवेळी परळी मतदारसंघात ईव्हीएमसोबत छेडछाड करण्यात आली, त्यासाठीच मला बाजूला करण्यात आलं आणि नंतर अकाऊंटवर १० लाख रुपये देण्यात आल्याचं निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी म्हटलं. तसेच, वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी धनंजय मुंडे यांची ऑफर होती असा दावाही त्यांनी पुन्हा एकदा केला. रणजीत कासले हे पुणे विमानतळावर आल्यानंतर त्यांना बीडच्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यामध्ये धनंजय मुंडेपासून ते मुख्यमंत्री फडणवीसांपर्यंत आणि बीड पोलिसांपासून ते आयएएस-आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांवर रणजीत कासले यांनी गंभीर आरोप केले आहेत.

## तनिषा भिसे प्रकरणात राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून न्यायालयात याचिका

**पुणे, दि. १८ प्रतिनिधी**

पुण्यातील नामांकित दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीमुळे गर्भवती तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला झाला असल्याचा दावा भिसेंच्या कुटुंबीयांनी केला आहे. त्यानंतर पुण्यासह राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या समित्यांच्या मार्फत सुरु आहे. त्यातील ससून रुग्णालयाचा अहवाल पुणे पोलिसांना देण्यात आला आहे. अशातच तनिषा भिसे प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे पुणे शहराचे शहराध्यक्ष जगताप यांनी दिली आहे.

प्रशांत जगताप तनिषा भिसे प्रकरणी बोलताना म्हणाले की, तनिषा भिसे प्रकरणाच्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांनी कुटुंबाला शब्द दिला होता की, कारवाई करू. मात्र, अजूनही कारवाई ही झालेली नाही. आमच्या पक्षाच्या वतीने येणाऱ्या गुरुवारी 24 एप्रिल रोजी मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल करणार आहोत. ज्यात ससूनला देखील पार्टी करण्यात येणार आहे. दीनानाथ रुग्णालयाच्या बरोबर ससूनचे डीन आणि अधीक्षक यांना सहआरोपी करावं यासाठी याचिका दाखल करणार आहोत.

भाजपा आमदार अमित गोरखे यांच्या स्वीय सहाय्यकाच्या पत्नीचा दुर्दैवी मृत्यू झाला, एक प्रकारे तनिषा भिसे यांचा दीनानाथ रुग्णालयाने खूनच केला अशी परिस्थिती समोर आली आहे. मागच्या काही दिवसांपासून पुणे शहरांमध्ये राज्यभरात संताप व्यक्त केला जात आहे. यासंबंधीच्या वेगवेगळ्या अहवालामध्ये दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी असल्याचे चित्र समोर आलं होतं. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी सुद्धा एकूणच सगळे केस पेपर पाहिल्यानंतर, होय दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणाशी संबंधित डॉक्टर सुश्रुत घैसास आणि त्यांची एकूणच टीम दोषी आहे हे सत्य समोर आलं. पण, त्यानंतर आता पुण्यातील ज्या पोर्शे कार अपघात प्रकरण त्यातील रक्ताचे नमुने बदलले त्या रुग्णालयात आलेल्या अहवालामध्ये दीनानाथ रुग्णालयाला निर्दोष सोडण्यात आले आहे.

## साईबाबा संस्थान देशी गाईंची गोशाळा सुरु करणार

**शिर्डी, दि. १८ प्रतिनिधी**

शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीच्या बैठकीत देशी गाईंची गोशाळा सुरू करण्याच्या निर्णयाला मंजुरी मिळाली असून पहिल्या टप्प्यात भारतीय वंशाच्या १०० देशी (गावरान) गाई गोशाळेत दाखल होणार आहेत. गोशाळेमुळे साई मंदिरात दैनंदिन पूजाअर्चासाठी गावरान गाईचे शुद्ध दूध व तूप तसेच द्वारकामाईतील पेटत्या धुनीसाठी शेणाच्या गोवऱ्या उपलब्ध होणार आहेत. गोमाता रक्षणाचा संदेशही साईभक्तांमध्ये यानिमित्ताने जाणार आहे.

साईबाबा संस्थानकडे ३०० एकर जागा उपलब्ध आहे. अनेक दिवसांपासून विचाराधीन गोशाळा प्रकल्पाला साई संस्थान तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा प्रधान न्यायाधीश अंजु शेंडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. गावरान गाईंची गोशाळा सुरु करण्याचा तदर्थ समितीचा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यातून गोरक्षणाचे महत्व, संस्कृतीत अध्यात्मिकदृष्ट्या गायींना असणारे महत्त्वपूर्ण स्थान याबाबत अधिक जनजागृती होण्यास अधिक मदत होईल. परिसरातील युवकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. भारतीय वंशांच्या गायीचे संवर्धन होणार आहे.

द्वारकामाई धुनीत टाकण्यासाठी गाईच्या शेणापासून बनवलेल्या गोवऱ्यांचा खर्च मोठा असतो या खर्चात बचत होणार आहे. उच्च न्यायालयाची परवानगी प्राप्त होताच श्री साईबाबांची गोशाळा सुरु होईल. टप्प्याटप्प्याने साईबाबा संस्थानच्या लाडूप्रसादासाठी लागणारे गावरान गाईचे शुद्ध तूप उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे प्रसादाचा दर्जा व गुणवत्ता अधिक वाढेल तसेच इतर दुग्धजन्य पदार्थही अधिक शुद्ध व भेसळ विरहित प्राप्त होतील. साईबाबा गोशाळेस साईभक्तांकडूनही मोठी मदत होईल, अशी भावना साईभक्तांनी व्यक्त केली आहे.

## नवऱ्याने मुंबईला नेण्यास नकार दिल्याने दोन मुलांसह मातेची आत्महत्या; देवगडमधील घटना

**सावंतवाडी, दि. १८ प्रतिनिधी**

देवगड तालुक्यातील तिर्लोट- आंबेरी पुलावरून दोन लहान मुलांसह मातेने खाडीच्या पाण्यात उडी मारून आत्महत्या केली. सौ. श्रीशा सुरज भाबल (२४), श्रेयश (५) व दुर्वेश (४) अशी मृतांची नावे आहेत. पतीशी झालेल्या किरकोळ वादातून सौ. श्रीशा हिने मुलांसमवेत आत्महत्या केली असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून या घटनेने देवगड तालुका हादरला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिर्लोट- आंबेरी येथील सुरज सुहास भाबल यांच्याशी श्रीशा हिचा २२ जून २०१८ रोजी विवाह झाला. श्रीशाचे माहेर कर्नाटक रायचूर येथील असून ती आई वडिलांसमवेत कल्याण येथे राहत होती. तिचे पती सुरज भाबल हे नोकरीनिमित्त मुंबई दादर येथे राहत असून रेल्वेमध्ये नोकरीस आहेत. त्यांच्या लग्नाला सहा वर्षे झाली होती. सौ. श्रीशा ही तिचे मुलगे श्रेयश व दुर्वेश यांच्यासमवेत सासरी तिर्लोट आंबेरी येथे सासरे सुहास शिवराम भाबल, सासू सौ. सुहासिनी, दीर मिलींद यांच्यासमवेत राहत होती.

१५ एप्रिल रोजी दुपारी ३ वा. च्या सुमारास श्रीशा हिने आपल्या पतीशी फोनवरून मुंबईला घेवून जाण्याबाबत बोलत होती. परंतू पती सुरज याने मुंबई येथे राहण्याची व्यवस्था नसल्याने तीला मुंबईला घेवून जाण्याबाबत नकार दिला. यावेळी रागाने श्रीशाने सासू व सासरे यांना न सांगता रदोन्ही लहान मुलांना घेवून घरातून निघून गेली. तीचा आजूबाजूला शोध घेवूनही ती मिळाली नाही. आंबेरी जेटीजवळ श्रीशाचा मृतदेह आढळून आला. तसेच तेथीलच पिराचे पोय याठिकाणी श्रेयशचा मृतदेह सापडला. तर दुर्वेशचा मृतदेह आंबेरी खाडीपात्रातच कातळी किनारी सापडला.

घटनेची माहिती श्रीशाचे सासरे सुहास भाबल यांनी विजयदुर्ग पोलिस स्थानकात दिली. देवगड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. घटनेची माहिती समजताच पोलीस उपविभागीय अधिकारी घनःश्याम आढाव यांनी घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. यावेळी पोलीस निरीक्षक मनोज सोनवलकर, पोलिस उपनिरिक्षक दशरथ चव्हाण, पोलिस हवालदार प्रशांत जाधव, सुनिल पडेलकर, पो. कॉ. बाबाजी कांदे, प्रशांत गावडे, महिला पोलिस वनिता पडवळ यांनी घटनास्थळी पंचनामा केला. यावेळी तेथील रामकृष्ण जुवाटकर, तंटामुक्त समिती अध्यक्ष कुलदीप लिंगायत, पोलीस पाटील अमित घाडी उपस्थित होते. विजयदुर्ग पोलीस स्थानकात या घटनेची नोंद आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली आहे.

## महत्त्वाचे

### डॉ. आंबेडकर यांची शिकवण जगाला प्रेरणा देणारी : सावजी

**नाशिक ।** महामानव भारतरत्न घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती नासिक रोड येथे उत्साहात साजरी करण्यात आली जगभरात उत्साहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांची जयंती साजरी केली गेली. सर्वत्र अशांततेचे वातावरण असते वेळी देखील केवळ आपल्या भारताची घटना अशी आहे त्यामुळे भारतात शांतता आहे अशी जगाला शांततेचा संदेश देत आहे घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतिकूल काळामध्ये आपल्या जे मार्गदर्शन केले आहे त्यांच्या आधारावर आज आपण अभिमानाने गर्वाने वावरत आहोत ही घटना संविधान नवीन पिढीने वाचन करावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण शिक्षणावर आहे त्यांनी शिक्षणावर भर दिला संविधान बद्दल लोक गैरसमज पसरविता त्यामुळे आपण संविधान वाचणे गरजेचे आहे त्यातच खरी लोकशाही आहे आपण सर्वांनी संकल्प करु की प्रत्येकाने संविधान वाचले पाहिजे संविधान ची माहिती आपण सर्वत्र सांगितली पाहिजे असे आवाहन भाजप नेते व प्रदेश प्रवक्ते मा. लक्ष्मणराव सावजी यांनी केले. कार्यक्रमास संस्थापकीय अध्यक्ष श्री सुनील कांबळे मार्गदर्शक गुरुवर्य सुबोधजी व त्यांच्या सोबत असलेले वसर्व वंदनीय मित्रवर्य गणेश कांबळे यांसह अनेक मान्यवर अनुयायी उपस्थित होते.

### मानसिक छळाला कंटाळून युवकाची आत्महत्या

**सिडको ।** लग्नाचे नकार दिल्यास हुंडा मागणीची केस दाखल करून तुला व तुझ्या कुटुंबाला रोडवर आणीन, अशा प्रकारच्या धमक्यांनी त्रस्त झालेल्या युवकाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मोहिनी पांडे आणि तिचे संबंध असलेला मुलगा तसेच आणखी दोन जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत युवकाचे नाव हरेराम सत्यप्रकाश पांडे (वय ३६, रा. देवरिया, भठवा तिवारी, उत्तर प्रदेश) असून तो सध्या इन्कम टॅक्स कॉलनी, बुरकुले हॉलजवळ, उत्तमनगर येथे राहत होता. २ एप्रिल २०२५ रोजी रात्री त्याच्या राहत्या घरी त्याने आत्महत्या केली. या प्रकरणी मृताचा भाऊ हरेकृष्ण पांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहिनी पांडे, सुरेश पांडे, आणि मयंक मुनेंद्र पांडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, मृत हरेराम पांडे याचा मोहिनी पांडे यांच्याशी विवाह होण्याचा संभव होता. मात्र मोहिनी आणि तिच्या सहकाऱ्यांनी त्याच्यावर मानसिक दबाव टाकून, धमकावून त्याचा छळ केला. या त्रासाला कंटाळून त्याने आपली जीवनयात्रा संपवली, असा आरोप मृताच्या भावाने केला आहे. या प्रकरणाचा तपास मपोउनि सविता उंडे (पवननगर पोलीस चौकी) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, पुढील तपास अंबड पोलीस करीत आहेत.

### नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर


**नाशिक ।** नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनची सन २०२५ ते २०२८ या कार्यकाळासाठीची निवडणूक दि. ३ मे २०२५ रोजी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत अन्नपूर्णा हॉल, नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, सावरकर नगर, गंगापूर रोड,नाशिक येथे होणार आहे. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. मनीष लोणारी हे काम पाहणार आहेत. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ४ मे रोजी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान पॅव्हेलियन हॉल, गोल्फ क्लब त्र्यंबक रोड, नाशिक येथे होणार आहे. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे आजीव सभासद एकूण ३११२ असून, ६९ क्लब सभासद आहेत.

### त्रिशरण बुद्धी विहारात भीम जयंती उत्साहात

**सिडको ।** त्रिशरण यंग फ्रेंड कला क्रीडा सामाजिक शैक्षणिक शैक्षणिक सामाजिक विकास संस्था संचलित त्रिशरण बुद्धिविहार प्रांगणामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. बुद्धविहाराचे अध्यक्ष विनोद भडांगे, सचिव दीपक पवार, जयंती अध्यक्ष एम.डी. प्रताप, जयंती महिला अध्यक्ष पुष्पा कांबळे, संस्थेच्या संचालक डॉ. अनिल आठवले, शुद्धोधन घायतडक, कल्पना नेरकर, भारतीय बौद्ध महासभेचे सिडको विभाग अध्यक्ष संपतराव शिंदे, प्रभाकर तायडे आदी उपस्थित होते. संपतराव शिंदे यांनी त्रिशरण पंचशील घेऊन जयंतीनिमित्त मानवंदना देण्यात आली संपतराव शिंदे, संभाजी सावळे, एम.डी. प्रताप कल्पना नेरकर, डॉ. अनिल आठवले, विनोद भडांगे त्यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पांडुरंग अंबुलकर, खरे, राजेंद्र मोरे, आनंद हजारे, यशवंत बागुल, हिरामण साळवे, शारदा अंबुलकर, रंजना खरात, सविता अहिरे मीनाक्षी कळवणकर मंदा साळवे, हंसराज कांबळे, केदा बच्छाव, खंडोजी अहिरे आदींनी परिश्रम घेतले.

# सप्तश्रृंगी गडावर भाविकांचा आक्रोश; पाण्यापासून गाभाऱ्यापर्यंत सुविधांची मागणी

**कळवण ।** महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात आहे. सप्तशृंग गड आहे. हा गड सात शिखरांनी वेढलेला असून, या ठिकाणी सप्तशृंगी देवीचे मंदिर आहे. या गडाला महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्ध शक्तीपीठ मानले जाते. कळवण तालुक्यातील श्रद्धेचे केंद्र असलेल्या सप्तशृंगी गडावर येणाऱ्या लाखो भाविकांनी आपल्या मनातील वेदना आणि अडचणींचा आवाज देवस्थान ट्रस्टपर्यंत पोहोचवला आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता, कुंभमेळ्याच्या काळात तरी गाभारा मोठा करावा, तसेच व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली घेतला जाणारा शंभर रुपयांचा पास तात्काळ बंद करावा, अशी रोखठोक भूमिका शशिकांत बेनकेपाटील यांनी मांडली आहे. भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेली दीपमाळ सध्या बंद आहे, ती तातडीने सुरू करावी आणि दीपमाळीच्या तेलाची विक्री थांबवावी अन्यथा हा अन्याय सहन केला जाणार नाही, असा इशारा देखील त्यांनी



दिला आहे. मंदिर प्रवेशद्वारावरील डोम अरुंद आहे, त्याचे रुंदीकरण तातडीने करावे अन्यथा उपोषणाचा इशारा शशिकांत बेनकेपाटील यांनी स्पष्टपणे दिला आहे. तसेच शेंदूर लेपणासाठी उभारलेला डोम बाजूला हटवण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली आहे.सप्तशृंगी गड ट्रस्टची बैठक गड परिसरातच व्हावी, नाशिकच्या खरवंदे पार्कमध्ये नव्हे, असा ठाम आग्रह भाविक व ग्रामस्थांनी धरला आहे. याशिवाय, भाविकांनी वाहिलेल्या नारळांची विक्री थांबवावी, भाविकांच्या श्रद्धेचा अनादर होऊ नये अशी मागणीही त्यांनी केली आहे. गडावर येताना भाविकांना शुद्ध पाण्याची सोय उपलब्ध नसल्याने, तात्काळ स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी ठाम मागणी भाविकांनी केली आहे.तसेच, चढाई करताना असलेल्या पायऱ्या अत्यंत अरुंद असून, त्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी लवकरच रुंद कराव्यात अशीही मागणी आहे. चप्पल ठेवण्याच्या स्टँडवर कुठलाही कर्मचारी नसल्यामुळे, भाविकांच्या चपला हरवण्याच्या घटना घडतात. त्यामुळे तिथे कर्मचारी नेमावा, अशी तळमळीची मागणीही पुढे आली आहे. या सर्व मागण्यांकडे श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा भाविक आणि ग्रामस्थांचा संयम सुटू शकतो, असा इशारा शशिकांत बेनके पाटील आणि ग्रामस्थांनी दिला आहे.

# कॅनॉल बागाईतदार सहकारी संघाच्या उपाध्यक्षपदी नंदकुमार कदम बिनविरोध



**ओझर ।** येथील कॅनॉल बागाईतदार सहकारी संघ लि या संस्थेचे उपाध्यक्ष सोमनाथ परशराम शेलार यांच्या आवर्तन पद्धतीच्या पदाचा कार्यकाळ संपल्याने नूतन पदाच्या निवडीसाठी सहकार संस्था निफाडचे सहाय्यक विबंधक कांतीलाल गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक बोलावण्यात आली.

संचालकांच्या झालेल्या निवड प्रक्रियेत उपाध्यक्षपदासाठी नंदकुमार पुंडलिक कदम यांच्या नावाची सुचना अंबादास शंकरराव चौधरी यांनी आणून आनंदराव विश्राम बोराडे यांनी अनुमोदन दिले. निवड प्रक्रियेच्या अंतिम मुदतीपर्यंत नंदकुमार कदम यांच्या व्यतिरिक्त एकही नामांकन न आल्याने निवडणूक अधिकारी कांतीलाल गायकवाड यांनी निवडणुक बिनविरोध झाल्याने उपाध्यक्षपदासाठी नंदकुमार पुंडलिक कदम यांच्या निवडीची घोषणा केली. यावेळी संघाचे विद्यमान अध्यक्ष माणिकराव बोरस्ते व नवनिर्वाचित उपाध्यक्ष नंदकुमार कदम यांचे हस्ते निवडणुक अधिकारी कांतीलाल गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला तसेच संचालक मंडळाच्या वतीने नंदकुमार कदम यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून व निवडणूक प्रक्रियेचे कामकाज संघाचे व्यवस्थापक निवृत्ती गोटीराम शिंदे यांनी पाहिले. या बैठकीस संचालक सुदाम पाटील, मोहन पाटील, सुरेश कदम संतोष बोरस्ते राजाराम कातकाडे, देविदास चौधरी, तानाजी जाधव, अजित कदम, हर्षल मोरे, विलास शिंदे, बाळासाहेब जाधव, बाळकृष्ण झाल्टे, धोंडिराम जाधव, बाळासाहेब हिरे, कावेरी मोगल, अलका मोरे आदी उपस्थित होते.

> **संघाच्या संचालक मंडळ व अध्यक्ष माणिकराव बोरस्ते यांनी जो माझ्यावर आत्मविश्वास टाकून उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड केली त्याच विश्वासाने शेतकरी सभासद यांच्या अडचणी सोडवण्याचा व संघाच्या गत वैभवासाठी आणि उत्कर्षासाठीच निष्ठेने काम करणार असून टाकलेल्या विश्वासास तडा जाऊ देणार नाही**
> **– नंदकुमार कदम, नवनिर्वाचित उपाध्यक्ष कॅनॉल बागाईतदार संघ**

# न्यूयॉर्क बोटॅनिकल गार्डनच्या डेटाबेसमध्ये मविप्र त्र्यंबकेश्वर महाविद्यालय वनस्पतीशास्त्र विभागाच्या 'हेर्बेरीअम'ची नोंद

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर आणि अंजनेरीच्या दुर्गम जंगलांतील एकूण दुर्मिळ वनस्पतींचे भाग संकलीत करून अत्यंत मानाचा असा समजल्या जाणाऱ्या हर्बेरियम कोड मविप्रच्या त्र्यंबकेश्वर महाविद्यालयाने मिळविला आहे.

सेरोपेजिया अंजनेरिका (लहान खरपुडी) जी वनस्पती प्रामुख्याने अंजनेरीच्या जंगलांत सापडते आणि त्यावरूनच वनस्पतीचे नाव आहे. जिचा आयुर्वेदातही महत्त्वपूर्ण उपयोग केला जातो या आणि अशा १०३८ वनस्पतींचा संग्रह आता 'एम.व्ही.पी.एस' नावाने जगभरात ओळखला जाईल. दुर्मीळ आणि महत्त्वाच्या वनस्पतींच्या शास्त्रीय अभ्यासासाठी जतन करून ठेवण्यात येणाऱ्या वनस्पतीच्या काही भागांचा




संग्रह हा हर्बेरियम म्हणून ओळखला जातो. त्याला विशिष्ठ असा कूटअंक (कोड) देऊन या कोडच्या (अक्रोनिम्स) आधारे जगभरातून कोठूनही ह्या विशिष्ठ नमुन्यांबद्दल माहिती मिळवली जाऊ शकते. यासाठी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शरद कांबळे यांनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे सरचिटणीस ॲड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, सर्व संचालक मंडळ, महाविद्यालय विकास समिती व स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीधर पाटील, ॲड.कैलास पाटील, त्र्यंबकेश्वर मंदिर ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलग यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, डॉ. डी. डी. लोखंडे, प्रा. शशिकांत मोगल व प्राचार्य डॉ. डी. डी. पवार उपस्थित होते.

> **हेर्बेरीअम कोड मिळवणारे त्र्यंबकेश्वर महाविद्यालय हे नाशिकमधील पहिली संस्था ठरले आहे. सगळ्यात मोठे हेर्बेरीअम हे लंडन मध्ये आहे. ज्या संस्थेकडे ५०० पेक्षा जास्त वनस्पतींचे नमुने आहेत व या वनस्पतींची अद्ययावत माहिती उपलब्ध आहेत त्यानांच हा कोड मिळविता येतो. महाराष्ट्रात अगदी मोजक्या संस्थांकडे हा कोड आहे.**

# नांदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी सोमवारी सोडत

**नांदगाव ।** तालुक्यातील मुदत संपणाऱ्या ८८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी (दि. २१ एप्रिल काढण्यात येणार असल्याची माहिती नांदगावचे तहसीलदार सुनील सौंदाणे यांनी दिली.

महिला आरक्षणासाठी सोडत बुधवारी (दि. २३) उपविभागीय अधिकारी येवला येथील कार्यालयात दुपारी बारा वाजता काढण्यात येणार आहे. नांदगाव तालुक्यातील क्रांतीनगर, श्रीराम नगर, फुलेनगर, गिरणानगर, मल्हारवाडी, हिंगणवाडी, बानगाव बुद्रुक, कसाब खेडा,



भारडी, बोयेगाव, पिंपरखेड, नवसारी, घोटाने खुर्द, धनेर, नागापूर, तळवाडे, हिसवळ बुद्रुक, हिरेनगर, लोढरे, लक्ष्मी नगर, मंगळणे, पळाशी, टाकळी खुर्द, शास्त्रीनगर, मूळ डोंगरी, बोराळे, दहेरल, खादगाव, जामदरी, कासारी, माणिकपुंज, ढेकू खुर्द, गोंडेगाव, मळगाव, वेहेळगाव, बिरोळे, नवे पांझण, कोंढार, अस्तगाव, पांझणदेव, पानेवाडी, खिर्डी, टाकळी बुद्रुक, मोहेगाव, सोयगाव, हिंगण देहरे, जातेगाव, घोटाणे बुद्रुक, एकवही, बानगाव खुर्द, दहेगाव, बेजगाव, हिसवळ खुर्द, लोहशिंगवे, परधाडी, पिंपरखेड, कुसुमतेल, जवळकी, बोलठाण, बाभुळवाडी, न्यायडोंगरी, पिंपराळे, वाखारी, वंजारवाडी, भौरी, गंगाधरी, पोखरी, भालूर, चिंचविहीर, जळगाव खुर्द, जळगाव बुद्रुक, रोहिले बुद्रुक, आमोदे, सावरगाव, करीही,अनकवाडे, मोरझर, तांदुळवाडी, मांडवड, टाकळी खुर्द, साकोरा, रणखेडे, कळमदरी, वडाळी खुर्द, नांदूर, माळेगाव (क), चांदोरा आदी ग्रामपंचायतींचा आरक्षण सोडतील समावेश असून, नांदगाव तालुक्यात अनुसूचित जातीसाठी आरक्षित सभासदांची संख्या ६ आहे. अनुसूचित जमातीसाठी आरक्षित सभासदांची संख्या १२ आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित सभासदांची संख्या २४ असून, खुला (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी सभासदांची संख्या २४ आहे. अशा एकूण तालुक्यातील ८८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

# कीर्तनकारांना मोफत पुस्तके पुरविण्याची सेवा बजावणारे : संपत महाराज धोंगडे

**नाशिक ।** जिल्ह्यातील प्रसिद्धत कीर्तनकार तथा संत साहित्याचे गाढे अभ्यासक वैकुंठवासी आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांची ग्रंथसंपदा मोठी आहे. दरम्यान, ही ग्रंथसंपदा वारकरी संप्रदायातील भावी पिढीला संस्मरणीय ठरावी यासाठी आचार्य पवार यांची काही पुस्तके कीर्तनकारांना मोफत देण्याचे कार्य मागील काही दिवसांपासून ह.भ. प. संपत महाराज धोंगडे करत आहेत.

आचार्य जगन्नाथ पवार हे जुन्या पिढीतील नामवंत कीर्तनकार होऊन गेले. त्र्यंबकेश्वर रोडवर असलेल्या अंजनेरी येथे जगन्नाथ महाराज पवार यांचे संतधाम हे प्रतिष्ठान आहे. या प्रतिष्ठानचे उत्तर कार्य ह.भ .प .धोंगडे करत आहेत. संत तुकोबाराय व संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगवाणीवर वैकुंठवासी जगन्नाथ पवार यांची विशेष प्रभुत्व होते. आपल्या प्रासादिक वाणीने त्यांनी महाराष्ट्रभर संतांच्या साहित्यावर निरूपण केले आणि त्यातूनच त्यांना काव्यतीर्थ ही पदवी बहाल

**आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांची प्रेरक ग्रंथसंपदा**




करण्यात आली. खऱ्या अर्थाने जगन्नाथ महाराज पवार हे एक चालते बोलते अध्यात्माचे विद्यापीठ होते. प्रत्येक अभंगाचा सखोल अर्थ आपल्या वाणीने ते श्रोत्यांच्या अंतकरणात रुजवत होते. नाशिकच्या वारकरी संप्रदायात त्यामुळे त्यांची स्वतःची अशी एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. संत साहित्यामध्ये देखील त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांची विष्णू सहस्त्रनाम या ग्रंथाच्या अनेक आवृत्ती प्रकाशित झाल्या त्याचप्रमाणे संत निवृत्तीनाथांची सार्थ अभंग गाथा त्यांनी लिहिली आहे. आजवर निवृत्तीनाथांची सार्थ अभंग गाथा खूप कमी लेखकांनी लिहिली आहे. किंबहुना लिहिलीच गेली नाही असेही म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. त्यांचे आर्थिक ज्ञानराजा हे पुस्तक देखील प्रकाशाच्या वाटेवर आहे. त्यांचे हे संत साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचावे त्याचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी संपत धोंगडे प्रयत्नशील आहेत. जगन्नाथ पवार यांनी स्थापन केलेल्या आचार्य पवार प्रतिष्ठानचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत आणि पवार यांचा आध्यात्मिक वारसा ते जपत आहेत. पुस्तकाच्या रूपाने जनसामान्यांपर्यंत हे शब्द धन पोहोचवण्याची कार्य धोंगडे करत आहेत. धोंगडे यांची ओळख म्हणजे ते एक निष्ठावंत वारकरी आहे. आषाढी पंढरपूर त्र्यंबकेश्वर येथील वारी काळात ते सक्रिय आहेतच, मात्र इतरही सामाजिक व धार्मिक कार्यामध्ये ते नेहमी पुढे असतात. नाशिक, गंगापूर, गिरणारे, देवरगाव, त्र्यंबकेश्वर तालुका हरसुल, पेठ इत्यादी आदिवासी दुर्गम भागात देखील त्यांनी वारकरी संप्रदाय तसेच नवनवीन वारकऱ्यांना सोबत घेऊन आषाढी पंढरपूर दिंडी सोहळा मोठा केला आहे. अनेक वारकरी त्यांनी हिरहिरीने जोडले आहेत. देवरगाव परिसरामध्ये वैकुंठवासी बापू बाबा देवरगावकर हे आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांचे शिष्य आहेत. यांचे कार्य मोठे होते अर्थातच त्याच परिसरात धोंगडे यांनी देखील अनेक वेळा जाऊन तेथील बाल वारकरी तसेच युवा वर्गाला आपल्या वारकरी संप्रदायामध्ये जोडण्याचे कार्य त्यांनी केले आहे. महंत धोंगडे यांना काव्यतीर्थ जगन्नाथ महाराज पवार यांचा प्रदीर्घ असा सहवास लाभल्याने पवार यांची ग्रंथसंपदा आजही ते नव्याने प्रकाशित करून वारकरी बांधवांमध्ये वितरित करत आहेत.

# सरस्वती सहकारी बँकेस १ कोटी २२ लाख ८६ हजाराचा नफा : बोरस्ते

## ५१ कोटीचे ठेव उदिष्टपूर्ती; सभासदांना बारा टक्के नफा वाटण्याचा मानस

**ओझर ।** अद्यावत बँकींगच्या सुविधा उपलब्ध करणाऱ्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त खुर्ची वाटप सभासदांना त्वरीत कर्जपुरवठा करून संख्यात्मक व गुणात्मक आलेख उंचावत ओझरसह पिंपळगांव आडगांवसह खडक माळेगांव येथे आपली नवीन शाखा सुरू करत असलेल्या ओझरच्या सरस्वती सहकारी बँकेस आर्थिक वर्षात १ कोटी २२ लाख ८६ हजार रुपयांचा ढोबळ नफा तर सर्व तरतुदी वजा जाता ७६ लाख ११ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, गत आर्थिक वर्षापेक्षा १ लाख ११ हजाराने वाढ झाली आहे. संचालक मंडळाच्या नियोजनबद्ध कार्याने व सभासद ठेवीदार यांच्या सहकार्याने व कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे ठेव उदिष्टपूर्ती झाल्याने सभासदांना १२ टक्के नफा वाटणीचा मानस असल्याचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब बोरस्ते यांनी व्यक्त केला.

बँकेने पिंपळगांव येथे फ्रँकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली असून, या आर्थिक वर्षात युपीआय आयएमपीएस व एटीएम सुविधा उपलब्ध करणार असल्याचे बोरस्ते यांनी सांगून बँकेच्या आर्थिक स्थिती बाबत सांगितले की बँकेच्या सुनियोजनामुळे आर्थिक वर्षात २४६ सभासदांची वाढ होवुन ४३९२ इतके सभासद झालेले असून, सन २४-२५ या आर्थिक वर्षाखेरीस वसूल भागभांडवल २ कोटी ७४ लाख २२ हजार, राखीव निधी ८ कोटी २७ लाख ३७ हजार बँकेच्या ५१ कोटी ९९ लाख ८५ हजार ठेवी असून, सभासदांना ३१ कोटी ३२ लाख ७२ हजार कर्ज वाटप करुन सीडी रेशो ६०.२५ टक्के इतका आहे, बँकेने २५ कोटी ९९ लाख ८३ हजारांची गुंतवणुक केली आहे,

बाळासाहेब बोरस्ते संजय निफाडे

सीआरएआर २२.७१ टक्के असून, आर्थिक वर्षात थकबाकी कर्ज वसुल करून निव्वळ एनपीए २.०९ टक्के इतका कमी राखण्यात बँकेला यश आले आहे. बँकेचे खेळते भांडवल ६६ कोटी ५९ लाख २९ हजार असून ८३ कोटी ३२लाख ५७ हजार रुपयांचा विक्रमी व्यवसाय करून गत आर्थिक वर्षाच्या तुलनेत ९ कोटी ७७ लाख ८ हजार रुपयांची वाढ झाली आहे. यात कर्जदार ठेवीदार ग्राहक व सभासदांचा सिंहाचा वाटा असून, सभासदांनी काही बहुमुल्य व बँक सभासदांच्या उत्कर्षासाठी सुचना असल्यास निसंकोच कळवाव्या त्याचा प्राधान्याने विचार करून जास्तीत जास्त चांगल्या व अद्यावत बँकिंग क्षेत्रातील तंत्रज्ञानाची सांगड घालून युपीआय आयएमपीएस व एटीएम सेवा उपलब्ध करता येतील, असे आवाहनही संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब बोरस्ते यांनी शेवटी आवाहन केले आहे. यावेळी उपाध्यक्ष संजय निफाडे विश्वनाथ कारे निवृत्ती धनवटे, किशोर मोरे, रामराव गोसावी, प्रभाकर कुयटे, रामनाथ शिंदे, दत्ता रायते, संजय मोरे, मोहन पाटील, अशोक झाल्टे, चेतनकुमार बोरस्ते, शुभम गडाख, अशोक पिठे, कुसुम ताकाटे, शोभा शिंदे, मनोहर त्रिभुवन, ॲड. शामराव पगार, जनसंपर्क संचालक ॲड आदित्य बोरस्ते, पालक संचालक उत्तमराव कडलग, मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब ढोमसे, पिंपळगांव बसवंत शाखेचे व्यवस्थापक प्रदीप बोरस्ते आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### महापालिका नियुक्त करणार सर्वेक्षक



**नाशिक ।** महापालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षणे व लेआउट विकसित करण्यासाठी सर्वेक्षण करणे बंधनकारक असल्याने सर्वेक्षणासाठी सर्वेक्षक नियुक्त केले जाणार आहे. पाच वर्षांसाठी प्रति वर्ष पाच कोटी प्रमाणे २५ कोटी रुपये यांची तरतूद करण्यात आली असून महासभेवर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. महापालिका क्षेत्रात विकास करण्यासाठी विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. शहराचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास करताना इमारती रस्ते पदपथ शाळा क्रीडांगणे दवाखाने उद्याने पार्क तरुण तलाव स्मशानभूमी दफनभूमी गटारी पाईपलाईन मलनिस सारण केंद्र जलशुद्धीकरण केंद्र जल कुंभाचे आरक्षण विकास आराखड्यात टाकले जाते. जागा मालकांना रोख किंवा टी डी आर स्वरूपात मोबदला देऊन जागा ताब्यात घेतली जाते सार्वजनिक प्रयोजनासाठी जागेचा वापर करताना सर्वेक्षण करावे लागते. प्रास्तावित प्रकल्पांचे आवश्यक रेखांकन नकाशे तयार केले जातात सर्वेक्षणासाठी महापालिकेकडून सर्वेक्षक पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. विकास आराखड्यातील आरक्षण क्षेत्राची मोजणी करणे क्षेत्र निश्चिती नकाशा प्रमाणिकरण डीमारकेशन करणे अभिन्यास व बांधकाम परवानगी मंजुरीसाठी डी पी रस्त्यात जाणारे क्षेत्र निश्चिती संरेषा निश्चिती करणे आरक्षण संपादनासाठी प्रस्ताव तयार करणे भूमी अभिलेख खात्यामार्फत संयुक्त मोजणी करणे विविध योजना अंतर्गत विकास कामांचे प्राकलन तयार करण्यासाठी सर्वेक्षण करणे लेआउट मधील खुल्या जागेस कंपाऊंड करण्यासाठी सुधारित सर्वेक्षण व डीमार्केशन करणे जल कुंभ बांधण्यासाठी क्षेत्र मोजणे लेवल घेणे डी मार्ट केशन करणे आधी कामे नियुक्त सर्वेक्षक यांच्याकडून केली जाणार आहेत.

### प्रभाग ३१ मध्ये पाणी विकत घेण्याची वेळ

**इंदिरानगर ।** प्रभाग क्रमांक ३१ मधील हॉटेल एक्सप्रेस इनच्या मागे असणाऱ्या विजय लक्ष्मी नगरमधील नागरिकांना विकतचे पाणी घेण्याची वेळ आली आहे. गेली दोन वर्ष या भागातील विशेषता विजय लक्ष्मी रोड हाऊस मधील ४९ पेक्षा जास्त कुटुंबांनी विकतचे पाणी घेतले. महापालिका स्तरावर माजी नगरसेवकांना सोबत घेऊन महिला आणि नागरिकांनी निवेदने दिली त्यानंतर या भागात गतवर्षी पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली. पहिले दोन महिने व्यवस्थित पाणी मिळाले त्यानंतर मात्र पाण्याचा दाब कमी होत गेला. सध्या तर दिवसाआड पाणी मिळत आहे. ते देखील अवघ्या काही मिनिटांसाठी येते. त्यामुळे तळ टाक्या भरत नाहीत. परिणामी नागरिकांना पदरमोड करून खासगी टँकर बोलावून तहान भागवावी लागत आहे. सुरळीत असलेला पाणीपुरवठा अचानक टोकडा किंवा थेट बंद होण्याच्या मार्गावर का आला असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला असून, येथील पाणी समस्या सोडविण्याची मागणी निकिता पाटील राधा पाटील मयुरी वाजे प्रियांका वाजे छाया शेलार आदींनी केली आहे.

### श्री बालाजी मंदिरात सोमवारपासून ब्रह्मोत्सव

**नाशिक रोड ।** गंधर्व नगरी श्री बालाजी मंदिरात सोमवार तारीख २१ पासून गुरुवार तारीख २४ पर्यंत चार दिवसीय वार्षिक ब्रह्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या दरम्यान मंदिरात चार दिवस विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष कैलास मुदलीयार यांनी दिली. ब्रह्मोत्सवात सोमवारी सकाळी सातला पंचामृत अभिषेक विशेष अलंकरण नित्य आराधना तीर्थ गोष्टी सायंकाळी पाचला अंकुर रोपण आणि भूदेवी पूजन सायंकाळी साडेसहाला आचार्य महंत श्री कालिकानंद महाराज यांचे प्रवचन होईल. मंगळवारी तारीख २२ सकाळी सातला विश्व सेन पूजा पुण्याहवाचन पंचगव्य आराधना पंचगव्य प्राशन अग्नि मंथन सर्वांगी कुंडेशु आधार प्रयोग ध्वजारोहण आरती सायंकाळी सहाला स्वामी संविधान सरस्वती महाराज महंत १००८ गिरिजा नंद सरस्वती बुधवारी तारीख २३ सकाळी सातला विश्व पूजा पुण्याहवाचन आरती सायंकाळी कल्याणोत्सवम आशीर्वाचना नैवेद्यम तसेच श्री बालाजी विवाह सोहळा व महाप्रसाद होईल. गुरुवारी तारीख २४ सकाळी सातला चक्र स्नानम आणि पूर्ण होती सायंकाळी पाच ला बालाजी मंदिर परिक्रमा आणि शयन उत्सव सायंकाळी सहा ला माधवदास राठी महाराज यांचे प्रवचन होणार आहे भाविकांनी दर्शनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष विनायक उपाध्ये यांनी केले आहे.

### चमेलाबाई साळी यांचे निधन



**नाशिक ।** मोती चौक येथील रहिवासी सुनील भाऊलाल साळी यांच्या मातोश्री चमेलाबाई भाऊलाल साळी यांचे वयाच्या ९३ यावर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात तीन मुलं, मुली, सुना, नातवंडं असा परिवार आहे. सिडको येथील वृत्तपत्र विक्रेते विश्वनाथ भाऊलाल साळी यांच्या त्यामातोश्री होत.

# जितेंद्र भावेविरुद्ध आणखी एक खंडणीचा गुन्हा

## बदनामीकारक व्हिडिओ डिलीट करण्यासाठी मागितली २ लाखांची खंडणी

**नाशिक ।** फेसबुक लाईव्ह द्वारे बदनामीची धमकी देत तब्बल अडीच लाखांची खंडणी मागणारा कथीत निर्भय महाराष्ट्र पक्षाचा खंडणीखोर अध्यक्ष जितेंद्र भावेचे अनेक कारणाने उघडकीस येत असून बदनामीची खोटी तक्रार मागे घेण्यासाठी २ लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी भावे आणि त्याच्या कार्यकर्त्यांविरुद्ध मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका पाठोपाठ एक गुन्हे दाखल होऊन देखील त्याला अद्याप त्याला. अटक करण्यात आली नसून फेसबुकच्या माध्यमातून तो पोलीस यंत्रणालाच आव्हान देत असल्याचे दिसून येत आहे.

फेसबुक लाईव्ह द्वारे बदनामी करत तब्बल अडीच लाखांची खंडणी मागितल्या प्रकरणी निर्भय महाराष्ट्र पक्षाचा कथित खंडणी बहाद्दर अध्यक्ष जितेंद्र भावे विरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर भावेचे अनेक उद्योग उघडकीस येऊ लागले. शहरातील गंगापूर पोलीस ठाण्यात मनपा उद्यान विभागाचे उपायुक्त विवेक भदाणे यांच्या तक्रारीनुसार भावे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पुन्हा पंचवटी पोलीस ठाण्यात समाधान अहिरे रा. सातपूर यांनी भावे आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी जातीवाचक शिवीगाळ केल्या- प्रकरणी अॅट्रॉसिटी कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सूडबुद्धीने गुन्हे दाखल केल्याचा आरोप करीत भावेच्या समर्थकांनी आंदोलने करीत पोलिसांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाहीतर आपल्या कार्यकर्त्यांच्या वेगवेगळ्या फेसबुक अकाउंट वर भावेने पोलिसांना आव्हान दिलेच प्रकार समोर येत आहे.हा सगळा प्रकार घडत असताना भावे विरुद्ध राजेंद्र बोडके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुन्हा एकदा भावे विरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मे २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत जितेंद्र भावे आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी बोडके यांच्याविरुद्ध खोटा तक्रार दाखल केला होता.



हा अर्ज मागे घेण्यासाठी ५ लाख रुपये आणि फ्लॅट रिटर्न करण्याची मागणी केली त्यानंतर भावेच्या कार्यकर्त्यांनी बोडके यांच्या पत्नीला फोन करत धमकी देत पैशांची मागणी केली.

संशयित भावेने कुटुंबीयांचा बदनामीकारक व्हिडिओ बनवून सोशल मीडिया, समाजात आणि नातेवाईकांना पाठवला आणि व्हिडिओ डिलीट करण्यासाठी २ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचे तक्रारीत म्हटले आहे. इतके गुन्हे दाखल झाल्यानंतर भावे अद्याप मोकाट असून त्याला अटक करण्याची मागणी होत आहे.

# धक्कादायक : त्र्यंबकला गोवर्धनी नदीत अतिक्रमण



**नाशिक ।** त्र्यंबक शहरात अतिक्रमणाचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला असताना शहरातील भूमाफियांकडून आता थेट नद्यांमध्ये बांधकाम होत असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे शहरातील एका भूमाफियाने त्रंबक मधील गोवर्धनी नदीच्या पात्रात सिमेंट कॉंक्रीट टाकून बांधकाम केले असून या बांधकामामुळे नैसर्गिक जलस्त्रोत बंद झाल्याचा गंभीर प्रकार घडला आहे याला नगर परिषदेचे अधिकारी जबाबदार असल्याचे बोलले जाते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने त्र्यंबक शहराच्या आजूबाजूची परिस्थितीचा आढावा घेत असताना अहिल्या नदीच्या पात्रात एका भूमाफियाने नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता बांधकाम केले होते याबाबत मंत्री गिरीश महाजन यांनी दखल घेतल्याने पुढील बांधकाम थांबवण्यात आले किंबहुना जे बांधकाम झाले होते ते देखील पाडण्यात आले परंतु आता मात्र भूमाफियांचे धाडस अधिकच वाढल्याचे दिसून येत आहे शासनाची कुठलीही तमांना बाळगतात थेट नदी पात्रता सिमेंट कॉंग्रेसचे बांधकाम करून भू माफियांनी आता थेट शासनालाच आव्हान दिले आहे


या बांधकामामुळे नैसर्गिक जलस्त्रोत बंद होत असल्याने भविष्यात पाण्याची समस्या गंभीर होऊ शकते. कुठल्याही बांधकामासाठी नगरपरिषदेची परवानगी अनिवार्य असताना भूमाफिया थेट सार्वजनिक ठिकाणी बेधडकपणे अतिक्रमण करीत असल्याने नगर परिषदे समोर मोठे आव्हान उभे राहिले आहे, असे प्रकार सातत्याने उघडकीस येत असल्याने त्रंबक नगर परिषदेतील बांधकाम नगर रचना आणि अतिक्रमण विभागाचे अधिकारी अकार्यक्षम असल्याचे स्पष्ट होत आहे. अतिक्रमणाचा मुद्दा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला असताना बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र निद्रिस्त असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे मुख्याधिकाऱ्यांचे या कर्मचाऱ्यांवर कुठलेही नियंत्रण नसल्याने असे प्रकार घडत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे दरम्यान वाढत्या अतिक्रमणांना जबाबदार धरत मुख्याधिकाऱ्यांची बदली करण्याची मागणी केली जात आहे.

> “ त्र्यंबक शहरातील नागरिकांना नगरपरिषदेचे महत्त्व समजत नाही. त्यामुळे ते नगर परिषदेची परवानगी न घेता असे कामकाज करणे योग्य समजतात आता कुंभमेळा जवळ येत चालला आहे त्यामुळे लोकांना आपल्या जमिनी डेव्हलप करायच्या असतील परंतु घाई मध्ये ते नगरपरिषदेची परवानगी घेत नाहीत. हा प्रकार नक्कीच चुकीचं आहे. नैसर्गिक ओहोळ नदी नाले हे जपणं हे फक्त प्रशासनाचच नाही तर नागरिकांचा देखील कर्तव्य आहे.
>
> **– श्रिया देवचक्के, मुख्याधिकारी, नगरपरिषद त्र्यंबक**

**या बांधकामा संदर्भात माहिती मिळताच नगरपरिषदेकडून त्याची दखल घेत संबंधित बांधकाम काढून टाकण्यात येत आहे.**

# त्र्यंबक : दर्शनासाठी बोगस पास विक्री करणाऱ्या नारायणचा 'आका' भलताच...

**नाशिक ।** त्रंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जास्त पैसे घेऊन खोटे पास विकल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.मार्च महिन्यात घडलेल्या या प्रकाराबाबत मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित माचवे यांनी त्रंबक पोलीस ठाणे तक्रार दिल्यानंतर नारायण नामक युवका विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला परंतु नारायण हा केवळ एक छोटासा मोहरा असून त्याचा 'आका' वेगळाच असल्याबाबत उलटसुलट चर्चा होत आहे.या आकाचा शोध घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे.




त्र्यंबक शहरात काही दलालांकडून दर्शनाच्या नावाखाली बोगस पासेसची विक्री केली जात असल्याच्या अनेक तक्रारी होत्या. बोगस पासेसच्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल होत असून याबाबत कुणी तक्रार केल्यास गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत असल्याने या प्रकरणाची कुठेही वाच्यता होत नाही. मात्र दर्शनाच्या नावाखाली भाविकांच्या होणाऱ्या लूटीचा प्रकार अत्यंत गंभीर आहे. त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी संपूर्ण देशातून भाविक येत असतात त्यांना लवकर आणि सुलभरित्या दर्शन प्राप्त व्हावे यासाठी मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी व्हीआयपी दर्शनासाठी पासेसची योजना सुरू केली आहे. या योजनेचा काही जणांनी गैरवापर सुरू केल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे.दर्शनासाठी लागणाऱ्या पासेसची काळा बाजारात विक्री होत असल्याचा प्रकार अनेक दिवसांपासून होत असून त्याला आळा घालण्याची मागणी केली जात आहे. दि.२२ मार्च रोजी गुजरातचे भाविक दर्शनासाठी आले असता या भाविकांची फसवणूक झाल्यानंतर मंदिर प्रशासनाने गुन्हा दाखल करण्याचा पवित्रा घेतला. मंदिराच्या प्रवेशद्वारावर भेटलेल्या व्यक्तीने व्हीआयपी दर्शनासाठीची प्रत्येकी दोनशे रुपयांची तीन तिकिटे संबंधित भाविकांना दोन हजार रुपयात विकली. भाविकांनी घेतलेली तिकिटे आधार क्रमांकाशी जुळली नसल्याने स्कॅनिंग मशीनने ती स्वीकारली नाही. त्यामुळे या भाविकांना मंदिरात प्रवेश मिळाला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्या भाविकांनी ट्रस्टच्या कार्यालयात जाऊन तक्रार दिली. त्यानुसार नारायण नावाच्या व्यक्तीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा प्रकार अत्यंत गंभीर असून तिकीट विक्री करणारे दलाल थेट मंदिराच्या प्रवेशद्वारावरच बोगस तिकीट विक्री करत असतील तर यामागे नक्कीच कुणी मोठा मासा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. बोगस तिकीट विक्री करणाऱ्या नारायण वर नेमका कुणाचा वरदहस्त आहे याची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. त्र्यंबक शहरात सलग सुट्ट्यांच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होत असते. त्याचाच गैरफायदा या दलालांकडून घेतला जात आहे. असे बोगस प्रकार या ठिकाणी सातत्याने घडत असून काही भाविक तक्रार करत नसल्याने दलालांचे धाडस वाढले आहे. यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या मुळे नारायण हा केवळ मोहरा असून त्याचा आका भलताच असल्याचे बोलले जाते. या गंभीर प्रकरणी संशयित नारायणची सखोल चौकशी करून त्याच्या आकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी त्र्यंबकवासियांनी केली आहे.

# आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुरेश पांडे यांचे 'इंग्लिश शिकण्याचे रहस्य' या विषयावर जाहीर व्याख्यान

**पिंपळनेर ।** सध्याच्या जलदगती आणि स्पर्धात्मक युगात स्मार्ट कौशल्याने इंग्रजी भाषा शिकणे अत्यंत सुलभ असून सर्वांत सोपी भाषा इंग्रजी असल्याचे प्रतिपादन प्रा.सुरेश पांडे यांनी पिंपळनेर येथे आयोजित कार्यक्रमात केले.

येथील दर्शन इंग्लिश स्पीकिंग क्लासेस तर्फे "इंग्लिश आणि इंग्लिश शिकण्याचे रहस्य" या विषयावर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रा. सुरेश पांडे यांचे जाहीर व्याख्यान संपन्न झाले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. इंग्रजीसह, मराठी, गुजराथी, मल्याळम, खान्देशी, अहिराणी भाषेचा उपयोग करीत वेगवेळे उदाहरणे व प्रसंग सांगून अत्यंत सुलभ पद्धतीने इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि सद्यस्थिती यांची सांगड घालून दिली. तर मनोरंजनातून इंग्रजी भाषा कशी शिकता येईल याचे मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला उपस्थितांनी भरघोस प्रतिसाद दिला.

कार्यक्रमासाठी शहरातील शालेय विद्यार्थ्यांसह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पत्रकार, पालक, व्यावसायिक, गृहिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. डी. टी. पाटील यांनीं केला. प्रास्ताविक दर्शन क्लासेसचे संचालक महेश सोनवणे यांनी केले.सूत्रसंचालन व आभार रोहिदास घरटे यांनी केले.





# भंगारातील दुचाकी, चार चाकी वाहने उचलून नेल्याने अंबड पोलीस ठाण्याने घेतला मोकळा श्वास

**सिडको ।** अंबड पोलीस ठाण्याच्या परिसरात अनेक महिन्यांपासून अडथळा ठरत असलेल्या व साचलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहने अखेर हटवण्यात आली आहेत. या कारवाईमुळे संपूर्ण परिसरात मोठी साफसफाई करण्यात आली असून, या परिसराने आता अक्षरशः "मोकळा श्वास" घेतला आहे.





सिडको । भंगारात पडलेल्या दुचाकी व चार चाकी उचलून नेल्याने झालेली मोकळी जागा.

पोलिसांच्या कार्यालयाच्या मागील बाजूस अनेक दिवसांपासून स्थान न मिळालेल्या, जप्त करण्यात आलेल्या किंवा सोडून दिलेल्या गुन्ह्यातील वाहनांचा खच पडला होता. त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढली होती आणि ग्रीन जिमसारखी सार्वजनिक सुविधा वापरात येत नव्हती. साचलेल्या वाहनांमुळे परिसरात साप, विंचू आणि इतर कीटकांची संख्या वाढली होती. नागरिक तसेच पोलीस कर्मचारीही त्यामुळे त्रस्त झाले होते. मात्र आता वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या शंभर दिवस कृती आराखड्यानुसार अंबड पोलीस ठाण्याच्या परिसरात सकारात्मक बदल सुरू झाले आहेत. सुरुवातीस या परिसरातील सर्व अडथळा ठरणारी वाहने हटवण्यात आली. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर सफाई मोहीम राबवली गेली.

या कारवाईनंतर ग्रीन जिमचे उपकरण स्वच्छ करण्यात आले असून, ते पुन्हा कार्यान्वित झाले आहेत. आता पोलीस कर्मचारी आणि नागरिकही या जिमचा वापर व्यायामासाठी करू शकणार आहेत. फिटनेस वाढवण्यासाठी उपलब्ध असलेली ही सुविधा मागील काही काळात निष्क्रिय अवस्थेत पडून होती. आता ती जागा वापरण्यायोग्य झाली आहे. याशिवाय, अंबड पोलीस ठाण्याच्या इमारतीवर रंगरंगोटीचे कामही सुरू झाले आहे. खराब झालेली भिंती, उडालेला रंग आणि जीर्ण झालेले भाग यांच्यावर दुरुस्ती आणि सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. एकूणच पोलीस ठाण्याचा चेहरामोहरा बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या संपूर्ण उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासनाच्या या कृतीचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. "पोलिस प्रशासन फक्त कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठीच नव्हे, तर लोकांना सकारात्मक अनुभव देण्यासाठीही सजग आहे," असे मत अनेकांनी व्यक्त केले. या प्रकारच्या सुधारणा केवळ सौंदर्यपूर्णतेपुरत्याच मर्यादित राहत नाहीत, तर त्या पोलिसांच्या कामकाजात उत्साह निर्माण करतात. स्वच्छ, सुरक्षित आणि मोकळ्या वातावरणात काम करताना पोलीस कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता निश्चितच वाढते, असे निरीक्षण देखील वर्तवण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या पुढाकारातून सुरू झालेला हा उपक्रम भविष्यात इतर पोलीस ठाण्यांसाठी आदर्श ठरू शकेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जनमानसातील आमदार डॉ. सिद्धार्थ खरात

सध्याचे बदललते राजकारण, नेत्यांची भाषा, नेत्यांनी केलेला स्वतः च्या नातेवाईकांचा विकास बघितला तर लोक प्रत्येक नेत्याकडे नेता म्हणून नाही तर स्वतःचे व नातेवाईकांचे घर भरणारा स्वार्थी, जनतेच्या समस्येची जाणिव नसलेला निर्दयी व्यक्ती म्हणून आज नेत्यांची सर्वसामान्य जनतेत ओळख निर्माण झाली आहे. परंतु सिद्धार्थ खरात याला अपवाद आहेत.

अनेक आजी माजी आमदार खासदार हे केवळ पक्षाच्या जोरावर किंवा पक्षातील नेत्यांच्या जोरावर स्वतः चे वर्चस्व मतदारसंघात निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जनतेच्या समस्या सोडवणे असते बाजूला आणि नेत्याला पोषक असे वातावरण मतदारसंघात निर्माण करण्यासाठी जो लोकप्रतिनिधी निवडणुकीत निवडून आलेला असतो तोच प्रतिनिधी गुन्हेगारी, व्यसन याला चालना देऊन, बेरोजगार तरुण आपल्या भोवती फिरावे म्हणून चुकीच्या कामाचे संरक्षण केले जाते.

निवडून आलेल्या आमदार खासदारांची भाषाही बदलते. बरेच आमदार खासदार मतदार संघातील गुन्हेगारी प्रवृत्ती च्या लोकांसोबत जास्त दिसतात पण सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. सर्वसामान्य जनता आमदार खासदार यांना भेटायला व्याकुळ म्हणल्या पेक्षा त्रासुन जाते परंतु साहेब काही भेटत नाही. ते नेहमीच मिटींगमध्ये असतात. मतदारसंघातील लोकांच्या समस्येपेक्षा महत्वाच्या कोणत्या मिटींग असतात हे अजूनही जनतेला कळाले नाही.

परंतु डॉ. सिद्धार्थ खरात हे सर्वसामान्य जनतेच्या मनातील आमदार आहेत. याचे कारणही तसेच आहे. त्यांच्या भोवती गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांचे वलय नाही. डॉ सिद्धार्थ खरात हे जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय शोधुन समस्येचे निराकरण करतात.

डॉ. सिद्धार्थ खरात हे कोणत्या पक्षाचे आहेत हे महत्त्वाचे नाही. मी कोणत्याही पक्षाचा अधिकृत सदस्य नाही किंवा पक्षाच्या भुमिकेला समर्थन करत नाही. परंतु डॉ. सिद्धार्थ खरात यांनी आमदार म्हणून जी ओळख निर्माण करून आमदाराचे महत्व जनतेला आपल्या कामातून पटवून देत आहेत ते मात्र खुप छान आहेत.

डॉ. सिद्धार्थ खरात यांचा आणि राजकारणाचा प्रत्यक्ष संबंध मुळीच नाही. शिक्षणाच्या जोरावर अधिकारी होऊन प्रशासकीय सेवेत असतानाही त्यांनी सर्वसामान्य जनतेची कामे अगदी वेळेत करून अधिकारी कसा असावा हे सिद्ध करून दिले. प्रशासकीय सेवेत असतानाही त्यांनी जनतेच्या कामासोबतच फुले शाहु आंबेडकर चळवळीचे काम जोमाने केले.

चळवळीतील कोणताही कार्यकर्ता त्यांना भेटला तर चळवळीविषयी चर्चा करण्यासाठी ते विशेष वेळ देऊन सवोतीपरी सहकार्य सुद्धा करायचे. म्हणून डॉ. सिद्धार्थ खरात हे सुशिक्षित व चळवळीच्या लोकांना अगोदर पासुनच आवडायचे.

अनेक लोक कर्मचारी असले तरीही समाजासाठी आणि चळवळीसाठी वेळ देत नाहीत. स्वतःला व्यस्त दाखवतात. परंतु डॉ सिद्धार्थ खरात हे प्रशासकीय अधिकारी आणि विशेषतः मंत्रालयात असुन ही चळवळ व माणसांशी जवळ राहीले म्हणून त्यांना आदर सन्मान मिळतच होता. मान सन्मान पैशाने विकत घेता येत नाही. तो जबरदस्तीने मागुनही मिळत नाही तो कर्तृत्वाने कमवावा लागतो. हेच डॉ. सिद्धार्थ खरात यांच्या कडे बघितले की दिसून येते.

आपल्या प्रशासकीय सेवेचा राजिनामा देऊन प्रत्यक्ष समाजात जाऊन समाजाची सेवा करण्यासाठी ते राजकारणात आले. आमदार होऊन जनतेच्या प्रश्नांचे निरसन करण्याचे



स्वप्न उराशी बाळगून त्यांनी निवडणूक ही लढली. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आणि पहिल्याच प्रयत्नात विधानसभा सदस्य म्हणून मेहकर मतदारसंघातुन निवडूनही आले.

जनतेने अराजकीय व्यक्तीला निवडून देणे म्हणजे परिवर्तन व त्या व्यक्तीवर किती मोठा विश्वास असेल हे दिसून येते. आहे हे केवळ साध्य झाले ते सिद्धार्थ खरात यांच्या स्वभावामुळे, त्यांच्या कार्यामुळे.

तिस वर्षांपासून एकांगी चालणाऱ्या राजकारणाला सिद्धार्थ खरात यांनी बदलून खरचं इतिहास रचला. खरं तर सिद्धांर्थ खरात निवडून आले हा तर इतिहास आहेच पण महत्वाचा मुद्दा अजून पुढे आहे तो म्हणजे निवडून आल्यावर त्यांनी जनतेचे काम करताना तो कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या जातीचा आहे बघितले नाही तर त्याची समस्या काय आहे ती समस्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केले.

आमदार फक्त पक्षातील कार्यकर्त्यांचे, नातेवाईक यांचेच काम करतात असा समाजाचा असलेला समज त्यांनी हानुन पाडला. आमदार हा जाती धर्माचा नाही, पक्षाचा नाही तर जनतेचा असतो हेच त्यांच्या कार्यातून दिसून येते. म्हणून जनतेचे काम मोठ्या उत्साहाने करतात.

त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीने सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांनाही त्यांच्या कडून अपेक्षा आहेत. आज पर्यंत आमदार हा विशिष्ट लोकांचे काम करतो, विशिष्ट लोकांनाच भेटतो असा समज दुर झाल्याने ज्या लोकांनी तिन वर्षांपासून ज्यांना सहकार्य केले ते लोकही आज डॉ. सिद्धार्थ खरात यांच्या बद्दल आपुलकीने बोलताना दिसतात.

स्वतःच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गुणगान गाणे हे समजू शकतो पण विरोधी पक्षातील लोकांनी आमदार चांगला आहे म्हणून चर्चा करणे आणि असाच आमदार पाहिजे असे बोलणे हे सगळे श्रेय त्यांचे कार्य यांना जाते.

एकही गुन्हा दाखल नसलेले आमदार डॉ. सिद्धार्थ खरात हे तरुणांमध्ये गुन्हेगारी व व्यसनाधीनता वाढू देत नाहीत ही आनंदाची बाब असताना त्यांच्या कार्या वर शेतकरी, शेतमजूर, छोटे मोठे व्यावसायिक सर्वजन खुश आहेत.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

आमदाराबद्दल मतदार संघात सकारात्मक मत निर्माण करण्याचे काम आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. जनमानसात सन्मान मिळवून जनतेच्या कामाला वेग आला. सुशिक्षित आमदार त्यातही चळवळीचा कार्यकर्ता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खरा अनुयायी कसा असतो. हे दाखवून देण्याचे काम आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

जनकल्याण व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी विरोधकांचा विरोध न करता विरोधकांना सोबत घेऊन जनता दरबार भरवणारे आमदार म्हणजे सिद्धार्थ खरात होत. निडर, परखड मत मांडून संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची योग्य मांडणी करणारे सिद्धार्थ खरात हे खरोखरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारस आहेत. म्हणून त्यांच्या वर लिहण्याचा मोह आवरला नाही.

या मधून कोणत्याही पक्षाचा मी प्रचार मुळीच करत नाही. परंतु डॉ. सिद्धार्थ खरात हे संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारस असल्याने अशा लोकांमुळे परिवर्तन शक्य आहे. यासाठी थोडक्यात मत मांडण्याचा प्रयत्न केला. मतदारसंघातील विकास करण्यासाठी त्यांच्या कडून खुप अपेक्षा आहेत. हळूहळू सर्व समस्या सुटतील असा आशावाद लोकांमध्ये निर्माण झाला. म्हणून जनमानसातील आमदार म्हणून डॉ. सिद्धार्थ खरात यांची ओळख आहे.

■ ■ ■

# अभ्यास आणि स्वविकास

आज आपण अभ्यासाच्या माध्यमातून आपला विकास कसा घडवून आणावा यावर काही बोलू...

त्या अनुशंगाने आपण अभ्यास करतांना स्वतःमध्ये काही विशेष गुण कसे येऊ शकतात किंवा आपल्यामध्ये असलेले गुण कसे वाढू शकतात, यांसंबंधी लक्षात आलेल्या काही बाबी आपण बघू.

**व्यावहारिक गुण कसे अंगी येतात?**

**व्यवस्थितपणाः** वह्या-पुस्तके ठरलेल्या ठिकाणी ठेवल्यास व्यवस्थितपणा हा गुण येतो.

**चांगली सवय लागणे :** जसा नामजप किंवा देवापुढे आरती प्रतिदिन केल्यावर ती पाठ होते किंवा त्याची सवय लागते, तसा अभ्यास प्रतिदिन केल्यावर त्याचीसुद्धा आपल्याला सवय लागते.

**एकाग्रता :** बराच वेळ एका ठिकाणी बसून अभ्यास केल्यावर एकाग्रता वाढते.

**संयम :** अभ्यास भरपूर असेल, तेव्हा धीर न सोडता तो पूर्ण कसा करावयाचा, हे शिकायला मिळते. यातून संयम वाढतो.

**प्रामाणिकपणा :** परीक्षेत एखाद्या प्रश्नाचे उत्तर नीट येत नसल्यास, ते दुसऱ्याचे न बघता ( म्हणजेच कॉपी न करता) स्वतःला येते, तेवढेच लिहिण्याने आपल्यामध्ये प्रामाणिकपणा विकसित होतो.

**बौद्धिक गुण कसे अंगी येतात?**

**नियोजनबद्धता :** अभ्यासाचे नियोजन केल्यास किती दिवसांत, किती तास अभ्यास केल्यावर एक विषय पूर्ण होईल, हे कळते. यामुळे आपल्याला नियोजन करण्याची सवय लागते.

**निर्णयक्षमता वाढणे :** दोन महत्त्वाच्या विषयांत कुठला विषय जास्त महत्त्वाचा आहे, हे ठरवावे लागते आणि त्यानुसार अभ्यासाला प्राधान्य द्यावे लागते. यामुळे निर्णयक्षमता वाढते.

**पूर्वसिद्धता,पूर्व तयारी करणे :** आधीपासूनच सर्व प्रकारची सिद्धता (तयारी) केली, तर परीक्षेच्या वेळी अतिरिक्त ताण येत नाही, हे समजल्याने कोणत्याही कामासाठी पूर्वसिद्धता करण्याची सवय लागते.

**वेळेचे महत्त्व समजणे :** उत्तरपत्रिका लिहितांना वेळ किती महत्त्वाचा आहे आणि त्यातही काही मिनिटेसुद्धा कशी महत्त्वाची आहेत, हे कळते.

**चांगले गुण कसे अंगी येतात?**

जसे की आपण काही लक्ष आपल्यापुढे ठेवले की आपोआपच आपल्या मध्ये काही गोष्टी अंगी येतात त्या म्हणजे,

**जिज्ञासूवृत्ती वाढणे :** प्रत्येक विषयात पुढचे पुढचे शिकायला मिळते आणि जिज्ञासाही वाढते.

**विचारून घेण्याची सवय लागणे :** एखादे सूत्र न कळल्यास ते शिक्षकांना विचारावे लागते.

**तत्परता :** मनात आलेली शंका शिक्षकांना तत्परतेने विचारायला शिकतो.

**इतरांकडे लक्ष न देणे :** एखादा प्रश्न किंवा शंका वर्गात शिक्षकांना विचारल्यास इतर विद्यार्थी हसतील, हे ठाऊक असूनही शंकानिरसन करून घ्यावे लागते.

**उत्साह वाढणे :** प्रतिदिन नवीन शिकायला मिळाल्यामुळे उत्साह वाढतो.

**सातत्य :** शाळेत / महाविद्यालयात प्रतिदिन जाणे आणि प्रतिदिन अभ्यास करणे, यांमुळे त्यात सातत्य येते.

**तळमळ वाढणे :** एखाद्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही, तर त्याचे उत्तर मिळवण्याची तळमळ वाढते.

**स्वभावदोष-निर्मूलन :** उत्तरपत्रिका पडताळल्यावर (तपासल्यावर) शिक्षक चुका सांगतात, त्यामुळे स्वभावदोष (उदा. घाई करणे) कळतात आणि त्यांचे निर्मूलन करण्याची संधी मिळते.

**अहं-निर्मूलन :** गुण अल्प (कमी) मिळाल्यावर आपोआप अहं-निर्मूलन होते. मित्र / मैत्रीण यांना एखादा प्रश्न विचारल्यास त्यांनी एवढेही तुला येत नाही, असे म्हटल्यावर अहं-निर्मूलन होते.

**मनाविरुद्ध कार्य करणे :** अभ्यासाची इच्छा नसतांना अभ्यास करण्यास बसल्यावर मनोलय होण्यास साहाय्य होते. विषय आवडता असो कि नावडता त्याचा अभ्यास करावाच लागतो; म्हणून आवड-नावड घटते.

**दुसऱ्यांचे साहाय्य घेणे आणि त्यांना साहाय्य करणे :** एखादे कठीण गणित न कळल्यास अन्य विद्यार्थ्यांना विचारावे लागते, तसेच त्यांनाही एखादे गणित न कळल्यास साहाय्य करावे लागते.

**तळमळीने प्रार्थना करणे :** एखादा विषय जास्त अवघड असला, तर ईश्वराला ह्यमला खरंच काही येत नाही, तू साहाय्य करह्, अशी तळमळीने प्रार्थना होते.

**अंतर्मुखता येणे :** अन्य विद्यार्थी जेव्हा जास्त गुण मिळवतो, तेव्हा मी कुठे मागे (कमी) पडलो, याविषयी अंतर्मुखतेने विचार होतो.

**कृतज्ञता वाढणे :** परीक्षेत अभ्यास केलेल्या भागावरच प्रश्न येतात, तेव्हा कृतज्ञता वाटते.

**त्याग :** अभ्यासाच्या दिवसांत पाहुणे आल्यास त्यांच्यासमवेत बाहेर फिरायला जाता येत नाही, त्या प्रसंगी आपण त्याग शिकतो.



प्रफुल्ल क. दाते

**आनंद मिळणे :** अभ्यास मनापासून केला की, समाधान आणि आनंद मिळतो.

मित्रांनो, अभ्यास ही एक कला आहे, ह्या गोष्टी मी आपल्यापुढे ठेवल्यात आणि ह्या काही बाबींना लक्षात घेवून आपण तसे केल्यास त्यातून विकसित होणारे गुणही निश्चितच आपल्यात यावे,यासाठी मी परमेश्वराच्या चरणी व आपल्या प्रती कृतज्ञ आहे. हे सगळे गुण आम्हा सर्व विद्यार्थ्यांमध्ये येऊ देत, हीच प्रार्थना !

●●●●

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते.

चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते.

शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत. पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत.

त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला.

१८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले.

याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले.

या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला.

हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विनवर कोणताही परिणाम होत नव्हता. त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांती वादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

●●●●

# गावखेड्यातील जिल्हा परिषद शाळांचा ऱ्हास

गावागावात शिक्षणाचे दीप उजळणाऱ्या जिल्हा परिषद शाळा आज अस्तित्वाच्या संकटात सापडल्या आहेत. जिथे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांची मुले शिकून मोठी झाली, समाजासाठी कर्तृत्व गाजवले, तिथेच आज ओसाड पडलेल्या वर्गखोल्या आणि कुलूपबंद शाळा दिसत आहेत. शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या बदलांनी समाजाचा पाया हादरवला आहे आणि हे परिवर्तन नक्की योग्य दिशेने आहे का, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

**'शिक्षण' की 'शिक्षणाचा बाजार'?**

एकेकाळी जिल्हा परिषद शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर असायचे. विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या या शाळांनी डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी, शिक्षक, साहित्यिक घडवले. पण आज शिक्षणाच्या नावाने बाजार मांडला गेला आहे. खासगी शाळांचे जाळे एवढे विस्तारले आहे की, ग्रामीण भागातील पालकही त्याकडे आकर्षित होत आहेत.

मोहपाटीच्या जाळ्यात अडकून अनेक पालक आज महागड्या फी भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांत टाकत आहेत. पण प्रश्न हा आहे की, हे शिक्षण त्यांच्या मुलांना खऱ्या जगण्याच्या अनुभवाशी जोडत आहे का? यंत्रवत शिक्षण घेऊन मुले मोठी होत आहेत, पण त्यांच्यात जीवनसंघर्षाची जाण नाही, खऱ्या जगण्याची समज नाही, आणि शेवटी नोकऱ्यांसाठी धडपडणारी बेरोजगार पिढी तयार होत आहे.

**शिक्षण व्यवस्थेचे अपयश**

शहरातील आकर्षक शाळांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या जाळ्यात ओढले, आणि त्यामुळे गावातील जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या झपाट्याने घसरली. विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे अनेक शाळा बंद पडत आहेत. आज कित्येक गावांमध्ये जुने, ऐतिहासिक जिल्हा परिषद शाळांचे इमारती पडझड झालेल्या अवस्थेत उभ्या आहेत. शिक्षणाची गंगा जिथे वहायची, तिथे आता नीरव शांतता आहे.

**याचे परिणाम दूरगामी आहेत :**

१. गावातील शिक्षणसंस्था बंद होत आहेत, त्यामुळे शिक्षणाची उपलब्धता मर्यादित झाली आहे.
२. शेती व ग्रामीण संस्कृतीशी नाळ तुटत चालली आहे, शहरी शिक्षणाच्या ओढीने गाव सोडणारे लोक पुन्हा परतत नाहीत.
३. गरिबांच्या शिक्षणावर गदा येत आहे, कारण खासगी शिक्षण सर्वांना परवडणारे नाही.
४. गावकऱ्यांमध्ये सामाजिक विषमता वाढत आहे, कारण शिक्षणाच्या वर्गवारीमुळे गरिबांचे शिक्षण दुय्यम ठरते आहे.

**उपाय :** जिल्हा परिषद शाळांचे पुनरुज्जीवन हा काळाची गरज आहे. सरकार आणि समाजाने मिळून याचा गंभीर विचार केला पाहिजे. काही उपाय असे असू शकतात.

१. शासकीय शाळांचे आधुनिकीकरण : तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जिल्हा परिषद शाळांना अधिक सक्षम बनवले पाहिजे.
२. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि इंग्रजी विषयावर भर : इंग्रजीचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी शिक्षण सुधारले पाहिजे.
३. गावकऱ्यांचे जागृती अभियान : पालकांनी केवळ आकर्षणाने खासगी शाळांत मुलांना न पाठवता जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व ओळखले पाहिजे.
४. सरकारी धोरणांचा पुनर्विचार : खासगी शाळांच्या बेकायदेशीर विस्तारावर नियंत्रण ठेवून, जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी शासनाने पावले उचलली पाहिजेत.
५. गावातच रोजगार निर्मिती : शिक्षण आणि गावच्या अर्थव्यवस्थेचा विकास एकत्र साधल्यास गाव सोडण्याची गरजच उरणार नाही.

**'मोहपाटी'च्या भूलथापांना बळी पडू नका!**

शिक्षण हे केवळ नावाला इंग्रजी असणे नव्हे, तर ते अनुभवात्मक, संस्कारक्षम आणि जीवनाशी जोडलेले असले पाहिजे. गावाकडची शाळा केवळ शिक्षण देत नाही, तर तेथील निसर्ग, माती, नाती, जीवनमूल्ये आणि सामाजिक बांधिलकी शिकवते. म्हणूनच, जिल्हा परिषद शाळा वाचवणे ही फक्त सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे.

गावखेड्याच्या मुलांना त्यांच्या गावातच उत्तम शिक्षण मिळावे, त्यांच्यावर शहरीकरणाचे कृत्रिम ओझे टाकले जाऊ नये आणि शिक्षणाच्या नावाने बाजार मांडणाऱ्यांना रोखले जावे, हीच खरी काळाची गरज आहे! ■ ■

# हवनाचे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व

वाचक लिहितात

हिंदू धर्मात हवन करण्यास विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून ही परंपरा चालू आहे. रामायण, महाभारत काळातच नव्हे तर त्या पूर्वीपासूनही हवन केले जात होते, याची अनेक उदाहरणे आहेत. अग्नीमध्ये विविध औषधी वनस्पती, तूप आणि अन्नधान्य यांची आहुती दिली जाते. हवनामुळे वातावरणातील दूषित घटक नष्ट होऊन वातावरण शुद्ध होते. हवन करताना होणाऱ्या मंत्रोच्चारांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. उच्चारित होणारे मंत्र व त्यातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे मन शांत होते.

हवनासंदर्भात काही शास्त्रज्ञांनी संशोधन केले आहे. फ्रान्समधील ट्रेले नावाच्या शास्त्रज्ञाने आपल्या संशोधनात निष्कर्ष काढला की, हवन मुख्यतः आंब्याच्या समिधांनी केले जाते आणि आंब्याचे लाकूड जळल्यावर फॉर्मिक अल्डिहाइड नावाचा वायू उत्पन्न होतो. हा वायू हानिकारक विषाणू आणि जिवाणूंना नष्ट करून वातावरण शुद्ध करतो.

'टौटिक नावाच्या शास्त्रज्ञाच्या हवनविषयक संशोधनात असे आढळले की, अर्धा तास हवन केल्यास किंवा हवनाच्या धुराचा शरीराशी संपर्क झाल्यास टायफॉईडसारखे हानिकारक रोग पसरवणारे जिवाणू नष्ट होतात आणि शरीर शुद्ध होते.

'राष्ट्रीय वनस्पती अनुसंधान संस्थान, लखनौ येथील शास्त्रज्ञांना असे आढळले की, हवनामुळे वातावरणातील हानिकारक विषाणू आणि जिवाणूंचा नाश होतो आणि एकदा केलेल्या हवनाचा परिणाम एक महिना टिकतो.

एथ्नोफामाकोलॉजी या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत (२००७) प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, यज्ञामुळे केवळ माणसालाच नव्हे तर वनस्पती आणि पिकांची हानी करणाऱ्या जिवाणूंचाही नाश होतो.

नुकतेच इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR)च्या वतीने जे. एल. एन. मेडिकल कॉलेज, अजमेर आणि श्रीराम इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त सहकार्याने केलेल्या संशोधनात असे आढळले की, जिवाणूजन्य रोग आणि त्यावरील उपचारांसाठी हवनचा धूर अन् त्याचा सुगंध रामबाण उपाय ठरत आहे. गुणवत्तापूर्ण साहित्य आणि औषधी वनस्पतींचा वापर करून केलेले हवन पर्यावरणातील हानिकारक जिवाणू नष्ट करते आणि व्यक्तीची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते.

वरील सगळे संशोधन हे आजच्या काळातील शास्त्रज्ञांनी केलेले आहे. मात्र, हिंदु धर्मशास्त्रात अग्निहोत्र, विविध यज्ञ आणि त्यासमवेत वापरण्यात येणाऱ्या सामग्री या संदर्भातील माहिती विविध ग्रंथात आढळते. अगदी दररोज अग्निहोत्र केल्यास अणुबाँब पडल्यावर निर्माण होणाऱ्या लहरींपासूनही संरक्षण होऊ शकते, असेही पूर्वी सिद्ध झाले आहे.

आजही अनेक संत याविषयी मार्गदर्शन करतात. परंतु त्याचे महत्त्व आपल्याला तेव्हाच पटते, जेव्हा त्याबाबत शास्त्रीय पद्धतीने संशोधन झालेले आपल्यासमोर येते. प्रत्यक्षात, हिंदू धर्मशास्त्रानुसार सांगितलेल्या प्रत्येक कृतीमागे वैज्ञानिक दृष्टिकोन आहे.

ऋषीमुनींनी वेद आणि उपनिषदांमध्ये सांगितलेले ज्ञान केवळ धार्मिक नव्हे, तर पूर्णतः वैज्ञानिक आहे. म्हणूनच ऋषीमुनींच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी दिलेले ज्ञान आचरणात आणायला हवे.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# सुंदरता आणि निरोगी शरीरासाठी हा पदार्थ ठरेल फायदेशीर

उन्हाळ्यात आरोग्याची विषेश काळजी घ्यावी लागते. निरोगी शरीरासाठी आहारात पोषक आहाराचा समावेश करणे महत्त्वाचे असते.

जर शारीरिकदृष्ट्या कमकुवत वाटत असेल तर आहारात भाजलेल्या चण्यांचा समावेश करा. भाजलेले हरभरे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. हरभरा आरोग्यासाठी वरदान मानले जाते. हरभऱ्यामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि खनिजांचा खजिना असतो, ज्यामुळे शरीर मजबूत होते.



भाजलेले चणे प्रथिने समृद्ध असतात आणि शाकाहारी लोकांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. भाजलेले हरभरे प्रथिने स्नायू तयार करतात आणि शरीराच्या दुरुस्ती प्रक्रियेत मदत करतात. शरीराला आवश्यक प्रथिने मिळतात, ज्यामुळे थकवा आणि अशक्तपणा दूर होण्यास मदत होते. भाजलेले हरभरा शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करते. त्यामध्ये असलेले लोह, जस्त आणि इतर पोषक तत्व शरीराला रोगांशी लढण्याची शक्ती देतात. भाजलेल्या हरभऱ्यात भरपूर फायबर असते, जे पचनसंस्था सुधारते. ज्या लोकांना पोटाच्या समस्या असतात त्यांच्यासाठी भाजलेले हरभरा हा एक चांगला घरगुती उपाय आहे. भाजलेल्या हरभऱ्यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स, लोह आणि जीवनसत्त्वे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात. भाजलेले हरभरे केसांना मजबूत बनवते आणि केस गळती थांबवते.

भाजलेले हरभरे हृदयासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. त्यामध्ये आढळणारे मॅग्नेशियम आणि फोलेट रक्तदाब नियंत्रित करतात. भाजलेले हरभरे कोलेस्ट्रॉल देखील नियंत्रित करते. याचे नियमित सेवन केल्याने हृदयरोगाचा धोका कमी होतो. भाजलेले हरभरे खाल्लयाने साखरेची पातळी लवकर वाढत नाही. दररोज मूठभर भाजलेले हरभरे खाल्ल्याने रक्तातील साखर स्थिर राहते आणि इन्सुलिन संवेदनशीलता देखील सुधारते. ■ ■ ■

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## अनामिक भय

मानवी जीवनाचं भविष्य
कुणालाच कळत नाही
म्हणून मनातील भय
भाऊ, कधी संपतच नाही . .

भितीचं करून भांडवल
भोंदु भरतात खिसे
कळतयं सारे हो पण -
वळत नाही कसे ? ..

टळेल इडा पिडा अन्
होईल सुखाचा संसार
या आशेनं प्रत्येक जण
घेतो गंडया दोऱ्याचा आधार . .

# केस गळतीनंतर आता नख गळती

## बोंडगावसह ५ गावामध्ये प्रकार : गावकरी हादरले

■ यशवंत पिंगळे, खामगाव, दि. १८ :

शेगाव तालुक्यातील बोंडगावामध्ये ३ महिन्यापूर्वी उद्भवलेल्या केस गळतीच्या समस्येनंतर आता केस गळती रुग्णांना नखगळतिच्या वेगळ्याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. ६ दिवसापासून असलेल्या या प्रकाराने गावकरी हादरले असून भीतीसदृश्य वातावरण पसरले आहे.

बोंडगावसह इतर ५ गावामधे सुद्धा नख गळती होत आहे. त्यामध्ये बोंडगाव १४, कालवड १३, कठोरा १०, मच्छिंद्रखेड ७, घुई २ अशा नागरिकांमध्ये नखे गळती होत आहे.या गंभीर प्रकाराची दखल घेत आरोग्य विभागाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत.

बोंडगावात सध्या सुमारे १० रुग्ण नख गळतीचे असून, आजूबाजूच्या गावांमध्येही अशीच लक्षणं दिसू लागली आहेत. आज बाजू गावात देखील नख गळतीचे रुग्ण आढळल्याने या प्रकाराचा परीघ वाढत असल्याची चिन्हं आहेत.

या प्रकाराची माहिती मिळताच आरोग्य विभागाने गावात सर्वेक्षण सुरू केले. यामध्ये डॉ. प्रशांत तांगडे (साथरोग तज्ज्ञ), अनिल बनकर (वैद्यकीय अधिकारी), जितेंद्र तायडे (वैद्यकीय अधिकारी), प्रमोद इंगळे (आरोग्य सहाय्यक), श्रीमती थारकर (आरोग्य सहाय्यिका) व आशा स्वयंसेविका यांचा समावेश होता. त्वचारोग तज्ञ डॉक्टर बालाजी आद्रर यांनीही रुग्णांची तपासणी केली. गावकऱ्यांनी ही बाब शिवसेनेचे शेगाव तालुका प्रमुख यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर रामा पाटील थारकर यांनी हा गंभीर विषय केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या निदर्शनास आणून दिला असून, या संदर्भात चर्चा देखील झाली आहे. केंद्रीय मंत्री जाधव यांनी याची तात्काळ दखल घेऊन आवश्यक ती मदत व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले आहे.







नख गळती बाधित रुग्णाच्या संपूर्ण शरीराची तपासणी शासन मार्फत मोफत करण्याची मागणी रामा पाटील थारकर प्रशासनास केली आहे.. त्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद सुद्धा दिला असून संशोधन पूर्ण होई पर्यंत नागरिकांची भयभीत न होण्याचे आवाहन केले आहे.संपूर्ण परिस्थितीवर प्रशासन व आरोग्य यंत्रणा लक्ष ठेवून आहे आणि लवकरच तपासण्या पूर्ण करून ठोस निदान देण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रकारामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी, प्रथमतः पाणी व पर्यावरणीय घटकांचा सखोल अभ्यास करण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कॅलिफोर्नियात उडवले १३ किलोचे विमान




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

अवघ्या काही ग्राम वजनाचे विमान आकाशात घिरट्या घालू शकते आणि हे फक्त एरोमोडेलिंगचे प्रशिक्षण घेतलेला विद्यार्थीच करू शकतो.

हाच विद्यार्थी जेव्हा १३ किलोचे विमान तयार करतो आणि त्यावर साडेचार किलोच्या वजनासह ते विमान एका रिमोटच्या साहाय्याने आकाशात उडवतो, तेव्हा ते ख?्या विमानाला देखील मात देते. तशी ही कामगिरी पार पाडणे एवढे सोपे नाही, पण नागपूरच्या तरुणाने जागतिक पातळीवर ही कामगिरी पार पाडत त्याची दखल घ्यायला लावली.

एरोमॉडेलिंगच्या जागतिक स्तरावर आयोजित स्पर्धेत नागपुरच्या युवकाने दुसरा क्रमांक पटकावला. अमेरिकेतील सोसायटी ऑफ ॲटोमोटीव्ह इंजिनिअर्स, कॅलीफोर्नियात ही स्पर्धा घेण्यात आली. यात जगातील ६० देशांमधील चमू सहभागी होत्या. त्यात भारताकडून मूळ नागपूरचा असलेला व सध्या पुण्यातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे शिकणाऱ्या महेश्वर ढोणे या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वातील चमू सहभागी होती.

माव्हेरिक इंडिया या चमूमध्ये दहा सदस्य होते आणि त्यांनी जागतिक पातळीवर या स्पर्धेत दूसरा क्रमांक पटकावला. ही स्पर्धा डिझाईन, पे लोड कॅपॅसिटी आणि फ्लाईंग एरो परफॉर्मन्सवर आधारित होती. या स्पर्धेत चमूने साडेचार किलो वजनासह विमान रिमोट कंट्रोलने उडवले. विमानाचे वजन १३ किलो होते.

नागपूरच्या महेश्वर सुनील ढोणे याने प्रकल्प संचालक, पायलट आणि मुख्य उड्डाण निरीक्षक म्हणून चमूचे नेतृत्त्व केले. २०२३ साली देखील त्याच्या नेतृत्वातील चमूने चेन्नई येथे ह्यसाईज ड्रोन डेव्हलपमेंट चॅलेंजह्न स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकवला होता.

त्यावेळी भारतातील ८१ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या चमू यात सहभागी झाल्या होत्या. लहानपणापासूनच एरोमॉडेलिंग स्पर्धेत महेश्वरला रुची होती. नागपूरच्या ह्यएरोविजन ग्रुपह्नचे संस्थापक डॉ. राजेश जोशी यांनी त्याला विमान तयार करण्याचे आणि ते उडवण्याचे प्राथमिक शिक्षण दिले. त्यानंतर महेश्वरची रुची वाढत गेली व त्याने आतापर्यंत सीड ड्रॉपिंग, थ्रीडी, फायटर जेट, डेल्टा, ग्लायडर, वॉक अलाँग ग्लायडर अशी अनेक प्रकारची विमाने तयार केली आहेत. त्याच्या आईवडिलांनी देखील त्याचा हा छंद त्याला लागणाऱ्या प्रत्येक वस्तु पुरवून बळकट केला. आता तो जागतिक पातळीवर यश मिळवून आला आहे.

### मुख्यमंत्री फडणवीसांना
# न्यायालयाचे समन्स

विधानसभा निवडणुकीतील विजयाला आव्हान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समन्स बजावले आहे. त्यांना ८ मेपर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मागील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या २६ उमेदवारांनी महायुतीच्या विजयी उमेदवारांच्या विजयाला आव्हान दिले आहे. दक्षिण पश्चिम नागपूर मतदारसंघातून काँग्रेसचे प्रफुल्ल गुडधे यांनी फडणवीसांविरुद्ध निवडणूक याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रवादीचे मनोज कायंदे आणि भाजपचे देवराव भोंगळे यांनाही समन्स बजावले. गुरुवारी भाजपचे मोहन मते आणि चिमूरचे आमदार कितीर्कुमार भांगडिया यांनाही न्यायालयाने नोटीस पाठवली.

याचिकाकर्त्यांनी ईव्हीएम संदर्भात गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक आयोगाने ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली नसल्याचा आरोप आहे. तसेच पराभूत उमेदवारांना सीसीटीव्ही फुटेज आणि फॉर्म क्रमांक १७ दिले जात नसल्याचेही म्हटले आहे. न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांनी निवडणूक आयोग आणि इतर प्रतिवादींची नावे वगळून केवळ विजयी उमेदवारांना नोटीस बजावली आहे. मते यांना ६ मे तर भांगडिया यांना ८ मेपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकाकर्त्यांच्या बाजूने ॲड. आकाश मून यांनी बाजू मांडली.

# पत्नीच्या शोधात गमावला त्याने जीव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत मेहंदीबाग पुलाजवळील जोशीपुऱ्यात एका व्यक्तीची दगडाने डोके ठेचून हत्या करण्यात आली होती. तपासात साळ्यानेच त्याची हत्या केल्याचे समोर आले आणि पोलिसांनी त्याला अटक केली.

ताराचंद प्रजापती (३५) रा. कळमना असे मृताचे तर, राहुल इंगळे (२५) रा. जोशीपुरा असे आरोपीचे नाव आहे. चौकशीदरम्यान राहुलने सांगितले की, जवळपास दीड महिन्यापूर्वी त्याची बहीण आणि ताराचंदची पत्नी ही त्याला सोडून एका नातेवाईकासोबत पळून गेली होती.

पत्नीच्या विरहात ताराचंद व्यसनाच्या आहारी गेला होता. तो दररोज साळ्याच्या घरी येऊन तिच्याबद्दल विचारपूस करीत होता. घटनेच्या दिवशीही तो साळ्याच्या घरी गेला होता. त्याची कॉलर पकडली, सांग माझी पत्नी कुठे आहे? अशी विचारणा केली.

दररोजच्या कटकटीला कंटाळून साळ्याने जवळच पडलेल्या दगडाने भाटव्याच्या डोक्यावर वार करून त्याची निर्घुन हत्या केली. गोळीबाराच्या घटनेला चोवीस तास होत नाही तोच खुनाच्या घटनेनी पुन्हा शहरात थरकाप उडाला.

मृतक ताराचंदला १० वर्षांचा एक मुलगा आणि ८ वर्षांची मुलगी आहे. मृतकाचे आई वडील माठ बनवून विक्रीचे काम करतात. ११ वर्षांपूर्वी ताराचंदचा प्रेम विवाह झाला. सुरूवातीचे दिवस चांगले गेले. नंतर मात्र, त्याला दारूचे व्यसन लागले. तो कामधंदाही करीत नव्हता. घर खर्च आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी पत्नीवर आली होती. कुटुंबाचा भार पत्नीवर आल्याने ती सुद्धा त्रस्त होती. हीच संधी साधून नातेवाईकाने तिच्याशी जवळीक साधली. तिला मदत करू लागला. त्यांचे सूत जुळले आणि दीड महिन्यापूर्वीच ताराचंदची पत्नी त्याच्यासोबत पळाली. पत्नी गेल्यापासून ताराचंद वेडापिसा झाला होता. आजोबांनी नातवांची जबाबदारी स्वीकारली. ताराचंद सतत पत्नीच्या शोधात भटकायचा.

नातेवाईकांना विचारपूस करायचा. त्याच्या पत्नी संदर्भात तिचा भाऊ आरोपी राहुलला माहिती आहे, अशी त्याला शंका होती. त्यामुळे तो सतत राहुलच्या घरी जायचा. पत्नी कुठे आहे, अशी विचारणा करायचा. दररोजच्या प्रकारामुळे राहुल आणि त्याची पत्नी त्रस्त झाली होती.

**रक्तबंबाळ अवस्थेत होता पडून**

घटनेच्या दिवशी दुपारी तो राहुलच्या घरी गेला. मात्र, राहुल घरी नव्हता. तो घरी परतल्यावर राहुलच्या पत्नीने ताराचंद पुन्हा आल्याचे सांगितले. राहुल पुन्हा संतापला. रात्री ९ च्या सुमारास ताराचंद पुन्हा राहुलच्या घराकडे गेला. राहुल त्याला रस्त्यातच भेटला. राहुलची कॉलर पडकून सांग माझी पत्नी कुठे गेली, तुला माहिती आहे, असे म्हणत राहुलला ओढले. संतापलेल्या राहुलने जवळच पडलेला दगड उचलून त्याच्या डोक्यावर वार केले. ताराचंद रक्तबंबाळ होत खाली कोसळला. माहिती मिळताच एपीआय मेघा गोखरे, एपीआय विलास पाटील, हवालदार अमोल बांबोलकर, सुहास राऊत यांनी घटनास्थळी धाव घेतली. ताराचंदला रूग्णालयात घेवून गेले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. दुसऱ्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि नागरिकांच्या माहितीवरून राहुलला अटक केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश खुणे यांनी परिसरात पोलिसांची गस्त वाढविली आहे.

# तिघांचा बळी घेणारा वाघ जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि.१८ :



तीन गावकऱ्यांचा बळी घेणाऱ्या वाघाला जेरबंद करण्यात चंद्रपूर वनविभागाला यश आले असून या वाघाची रवानगी गोरेवाडा येथे करण्यात येणार आहे.

उत्तर ब्रम्हपूरी वनक्षेत्रातील चिचखेडा बिटात दुपारी साडेबाराच्या सुमारास टी-३ वाघाला जेरबंद करण्यात आले. या वाघाला जेरबंद करण्यात आले.

ब्रम्हपूरी नवविभागअंतर्गत नवेगाव/आवळगाव उपक्षेत्र परिसरात टी-३ वाघाचे वास्तव्य होते. या वाघाकडून परिसरात सातत्याने गावकऱ्यांवर, जनावरांवर हल्ले होत होते. या वाघाला जेरबंद करण्याची परवानगी ब्रम्हपूरी उपवनसंरक्षक व प्रादेशिक मुख्य उपवनसंरक्षक यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास राव यांच्याकडे केली.

मानवावर वाढते हल्ले आणि वाढते बळी लक्षात घेता त्यांनी वाघाला पकडण्याचे आदेश जारी केले. त्याअन्वये वनविभागाच्या पथकाने सलग दोन दिवस तयारी करीत जंगलात पिंजरे लावले आणि गुरूवारी जंगल परिसरात अखेर या वाघाला जेरबंद करण्यात आले.

# पाणी पेटले : ठाकरे गटाकडून तोडफोड

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १८ :

वाढत्या तापमानासोबतच अकोलेकरांवर जलसंकट देखील कोसळले आहे. शहरातील विविध भागात अनेक दिवसांपासून पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाने गुरुवारी अकोला महापालिकेवर घागर मोर्चा काढला.

शिवसैनिकांनी आक्रमक भूमिका घेत पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या कक्षात तोडफोड केली. कार्यालयातील खुर्च्या फेकल्या. आंदोलकांनी घागरी फोडत पाण संतप्त मलकापूर येथील नागरिकांसह ठाकरे गटाने महापालिकेवर घागर मोर्चा काढला. ठाकरे गटाचे माजी नगरसेवक मंगेश काळे यांच्या नेतृत्वात हा घागर मोर्चा काढण्यात आला.

शिवसेनेच्या स्थानिक महिलांना सोबत घेत घागर डोक्यावर घेत महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागात धडक दिली होती. पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी अमोल डोईफोडे यांच्या कक्षात आंदोलनकर्ते दाखल झाले. ते कक्षात हजार नव्हते. यामुळे संतापलेल्या कार्यकर्त्यांनी कक्षातील खुर्च्यांसह इतर साहित्यांची तोडफोड करण्यात आली. महिलांनी त्यांच्या कक्षातच घागरी फोडल्या.

# २५ हजार वर्षापूर्वीचे हत्तीचे जीवाश्म आणि अवजारे सापडली




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

चंद्रपूर तालुक्यातील वर्धा-पैनगंगा नदीच्या पात्रात महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय शोध लागला आहे. भूशास्त्र संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांना २५ हजार वर्षांपूर्वीच्या स्टेगोडॉन गणेश हत्तीचे जीवाश्म सापडले आहे.

महाराष्ट्रात प्रथमच प्लेईस्टोसीन काळातील हत्तीचे जीवाश्म सापडले आहे. डायनोसॉरनंतर विदर्भात सापडलेले हे पहिलेच विशालकाय प्राण्यांचे जीवाश्म आहे. वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजीचे निवृत्त प्राध्यापक अविनाश नंदा यांच्यासह अनेक परदेशी संशोधकांनी या जीवाश्माची पुष्टी केली आहे. हे हत्ती सुमारे १५ फूट उंच होते आणि आजच्या आशियाई हत्तींचे पूर्वज मानले जातात. या शोधाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जीवाश्मांसोबतच पाषाणयुगीन मानवाने वापरलेली दगडी अवजारे सापडली आहेत.

यामध्ये हात कुऱ्हाडी आणि इतर साधने आहेत. एकाच ठिकाणी हत्तींची जीवाश्मे आणि पाषाणयुगीन अवजारे सापडल्याने तत्कालीन मानव हत्तींची शिकार करत असल्याचे स्पष्ट होते.प्लेईस्टोसीन काळात (२ लाख ते ११,७०० वर्षांपूर्वी) भारतात हत्ती आणि पाषाणयुगीन मानवांची मोठी वस्ती होती. या काळाच्या शेवटी आलेल्या हिमयुगामुळे झालेल्या महापुरात अनेक प्रजाती नष्ट झाल्या. त्याच पुराच्या गाळात हे जीवाश्म सापडले आहे. याच ठिकाणी एलेफास नामाडिकस या लुप्त झालेल्या हत्तीसदृश प्राण्याचे अवशेषही मिळाले आहेत. त्यामुळे या जीवाश्मांचे अधिक सखोल विश्लेषण करण्याची गरज असल्याचे मत प्रा. चोपणे यांनी व्यक्त केले आहे.

# शब्दकोडे क्रमांक २०८९



आडवे शब्द:-
१) एकाचा राग दुसऱ्यावर काढणे
८) बकरी
९) संगीतातील ठेका
१०) पर्वत अस्सल माल
११) विळखा
१२) सरोवर
१४) गावाचा कारभार पाहाणारा
१६) रामदासस्वामींनी मनाचे श्लोक या गावात लिहिले
१७) वाढलेला व्याप अस्तावस्त पसरलेले सामान
१९) जाण
२१) दुर्गंधी येऊ लागलेला
२४) गुरांचे नख
२५) नवऱ्याला हाक मारण्याचा एक शब्द
२६) तुफान
२७) जुगाराचा एक प्रकार
२९) श्रीविष्णूचा एक अवतार
३१) संतोषजनक
३४) नवरदेव
३५) प्रभात
३७) अंत:करण
३८) मीठाची चव
४०) लग्नादि कार्यासाठी जमलेला गोतावळा
४३) उत्सव
४४) अरण्य
४५) पतिव्रतेचा पुत्र
४७) वेळ, यम
४८) विधानसभेचा सदस्य
५१) कावळ्याचे ओरडणे
५३) होडी
५४) सुंदर युवती
५५) आघाडीला खेळणारा
५७) वैताग, बडबड
५८) एक पालेभाजी, मडके
५९) व्रात्य, मोकळा सुटलेला, निरुद्योगी
६०) समुद्र
६३) पुष्कळवेळा
६५) बाग, बगीचा
६८) अभिप्राय
६९) वाकडा नसलेला
७१) दुधाचे दही बनविणारा घटक
७३) दागदागिने
७५) मनोहरत्व
७६) धमनी, कापडी बंद
७७) पुरुष,
७८) गाय

उभे शब्द :-
१) पहिला ऋतू
२) सूचना, चिथावणी
३) गळीत धान्यातून निघालेला द्रवपदार्थ
४) मूल न होणारी गाय
५) वसाहत
६) नाथपंथी गोसावी
७) अंगापेक्षा मोठे झालेले वस्त्र
८) हिंमत, धैर्य
११) बशीचा जोडीदार
१३) विवाहातील एक विधि,
१५) मध्यस्थ, पंच
१६) चक्र
१८) आरक्षित
२०) खोलवर नसलेले, वरपांगी
२२) वाऱ्याने हलणाऱ्या पानांचा आवाज
२३) मुक्तता
२५) अवाजवी
२६) उत्तराधिकारी
२७) चिंतन
२८) कारखान्याचा मालक
३०) न आवडणाऱ्या माणसाचे गुणही दोष वाटतात (वा.प्र.)
३२) सापाची एक जात
३३) हस्त
३६) शरीर
३९) गाडीचे छत
४१) नाश
४२) कलावंत
४३) तलवारीचे म्यान
४४) कौसल्यापुत्र
४६) अत्यल्प, श्रीराम सीतेचा एक पुत्र
४७) गेरू
४८) मालाचे येणे-जाणे
४९) संथपणे, हलतडुलत
५०) वाळा
५२) इच्छा
५३) अपशकुन
५६) तिबेटी धर्मगुरू
५९) दानी, थोर मनाचा
६१) निमग्न, रममाण
६२) वार, दिवस
६४) गीत
६६) फुलांची छोटी टोपली
६७) वंदन
७०) दारूचा एक प्रकार
७२) यात्रेकरूंचा समूह
७४) झाडाभोवतीचा कट्टा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# विवाह सुवर्णबंधन कृतज्ञता सोहळा उत्साहात

**सटाणा ।** येथे महाराष्ट्र वाणी युवा मंचच्या वतीने वाणी समाजातील ज्या व्यक्तींच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण होऊन सुखी संसार पूर्णत्वास नेला अशा दांपत्यांचा विवाह सुवर्णबंधन कृतज्ञता सोहळा लाडशाखीय वाणी समाज मंगल कार्यालय, सटाणा येथे उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाला आशीर्वाद देण्यास विशेष अतिथी म्हणून कुकूरमुंडे गुजरात येथील परम पूज्य शउद्धव महाराज हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समको बँकेचे माजी चेअरमन श्रीधर कोठावदे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय प्रबोधन संस्था अध्यक्ष सुनील नेरकर, महाराष्ट्र वाणी युवा मंच प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पाचपुते, लाडशाखीय वाणी समाज मंडळ विश्वस्थ अध्यक्ष किशोर राणे, कार्यकारणी अध्यक्ष देवीदास येवला, महिला मंच अध्यक्ष अलका राणे हे उपस्थित होते.






परम पूज्य उद्धव महाराज यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे संपूर्ण सभागृह आध्यात्मिकतेने भारावून गेले. नेरकर यांनी आपल्या भाषणात सध्या समाजात सुरु असलेल्या विवाहिक समस्यावर परखड पणे भाष्य करत समाजाने काय करावे यासाठी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात कोठावदे यांनी आजच्या तरुण पिढीला सहजीवनाचे खरे अर्थ समजावून सांगितले. माणसाच्या आयुष्यात अनेक टप्पे येतात, पण पन्नास वर्षांचे एकत्रित सहजीवन म्हणजे खरं तर एक सुंदर, प्रेरणादायी प्रवास! या प्रवासाचा गौरव करणारा आणि आदर्श दांपत्यांचा सन्मान करणारा 'विवाह सुवर्णबंधन कृतज्ञता सोहळा' महाराष्ट्र वाणी युवा मंच सटाणा-बागलाण आणि महाराष्ट्र वाणी महिला मंच सटाणा यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत उत्साहात व भावनिक वातावरणात संपन्न झाला. बागलाण तालुक्यातील वाणी समाजातील अशा सर्व ज्येष्ठ दांपत्यांचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला, ज्यांनी विवाहाच्या पन्नास वर्षांचा टप्पा गाठून आपल्या नात्यातील प्रेम, समजूत आणि सहकार्याची सुंदर ठेव जपली. त्यांचा हा 'सहजीवनाचा सुवर्णमहोत्सव' संपूर्ण समाजासाठी एक आदर्श ठरावा, या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात सुवर्णविवाह झालेल्या दांपत्यांचा पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या सहजीवनातील अनुभव ऐकताना उपस्थितांच्या डोळ्यांतून नकळत आनंदाश्रूही वाहत होते. हा कार्यक्रम म्हणजे एक सामाजिक समविचार, सहकार आणि संस्कारांचा उत्सव होता. जुन्या पिढीचा सन्मान करताना नव्या पिढीला प्रेम, सहकार्य व समर्पणाची शिकवण देणारा एक अमूल्य ठेवा ठरला. कार्यक्रम यशस्वीततेसाठी महाराष्ट्र वाणी युवा मंच सदस्यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यात वाणी समाजातील समाज बांधव, महिला व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षल कोठावदे यांनी केले.

## शक्तीपाताचार्य भाऊनाथ महाराजांतर्फे २५ संस्थांना विविध वस्तूंचे वाटप

**नाशिक ।** आजच्या समाजात अनेक सामाजिक संघटना सामाजिक आणि धार्मिक संघटना समाजासाठी समाजसाठी आणि धार्मिकतेसाठी चांगले कार्य करत असतात. या संस्था संघटनांना मदतीची गरज असते. अशावेळी काही दानशूर व्यक्ती किंवा प्रतिष्ठान त्यांना मदतीचा हात देतात. मात्र या संस्थांचा दैनंदिन कारभार चालविणे बरेच वेळा सोपे नसते. मात्र सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शक्तीपाताचार्य भाऊनाथ महाराज यांनी आपल्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे निमित्त साधून नाशिक शहरातील विविध २५ सामाजिक धार्मिक संस्था संघटनांना २५ वेगवेगळ्या वस्तूंचे वाटप केले आणि समाजापुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे.



अध्यात्मातील संजीवनी शक्तीपाताचार्य श्री श्री भाऊनाथ महाराज अभिष्टचिंतन सोहळाप्रसंगी २५ च्या पटीत धान्य, डाळी, तेल, मिठ ,गहू, तांदूळ, फळे, भाज्या, किराणा, वह्या, पेन, साड्या, टॉवेलस, उन्हाळी टोप्या, ब्लँकेट्स, झाडू, मिठाया, भोजनपात्र, पाणीपात्र, अशा सर्वोपयोगी वस्तू चा दान संकल्प करून आगळा वेगळा लग्नाचा वाढदिवस साजरा करून समाजा समोर एक आदर्श ठेवला आहे. यात प्रामुख्याने आश्रय वृद्धाश्रम, नाशिक, महर्षी गौतम गोदावरी वेद पाठशाळा व आधार तीर्थ अनाथ आश्रम, त्र्यंबकराज वारकरी शिक्षण संस्था, श्रुति स्मृती प्रतिष्ठान, (त्र्यंबकेश्वर), वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय यांचा समावेश आहे. प्रारंभी श्री महाराज वा गुरुमाई यांचे मंगळवाद्याने स्वागत करून औक्षण करण्यात आले. यावेळी अवधूत व कुमारी संजीवनी व साधक परिवार यांनी त्यांचे स्वागत करून आशीर्वाचन घेतले. त्यानंतर मंगळदीपांनी औक्षण करण्यात आले. कार्यक्रमात धनूभाऊ वाकळकर, संजय गीते यांचे सुमधुर भजन तसेच वैभव पिंगळे गुरुजी यांचे नादमधुर वादन झाले. कार्यक्रमास ख्यातनाम व्यवसायिक संदीप खिवंसारा, अक्कलकोट अन्न छत्र मंडळाचे विश्वस्त शामराव तांबोळी, संदीप खैरनार, संगीतकार संजय गीते, लेखक विजय निपाणेकर, सुनीत वाकचौरे, जितेंन्द्र चव्हाण, सुभाष देवरे, संजय अमृतकर, शरद काळे, प्रकाश खैरनार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक धनंजय वाकलकर यांनी केले. सूत्रसंचालन संजीवनी खैरनार व मधुरा देशपांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन वृषाली देवरे यांनी केले. कार्यक्रमास मनोज खैरनार शरद काळे, दीपक सपकाळे, मिलिंद देशपांडे, देवदत्त भंगाळे, योगेश सूर्यवंशी, दीपक खैरनार, देव देवरे, पियुष खैरनार, अभिजित तांबोळी, केदार कुलकर्णी अप्पा पाटील व सहकारी आदी उपस्थित होते.

## चांदशी ज्येष्ठ नागरिक मंडळांतर्फे घरकुल संस्थेस भरीव देणगी

### दिव्यांग मुलींच्या कलाविष्काराने सारेच भारावले

**नाशिक ।** चांदशी येथील सन्मित्र ज्येष्ठ नागरिक संघाच्या सदस्यांनी वडनेरबहुला येथील प्रौढ मानसिक दिव्यांग मुलींसाठी चालविण्यात येत असलेल्या घरकुल परिवार संस्थेस भेट देऊन भरीव देणगी दिली.तेथील मुलींचे हस्त कौशल्य आणि कलाविष्कार बघून सारेच थक्क झाले.



कोणतेही शासकीय अनुदान न घेता दिव्यांग मुलींच्या पालन पोषणाची जबाबदारी चौखपणे पार पाडणाऱ्या संस्थेच्या व्यवस्थापनाचे करावे तितके कौतुक थोडे आहे, असे गौरवद्गार ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव माधव पाटील यांनी काढले. सहा महिलांच्या जोरावर २००६ मध्ये सुरू झालेल्या या संस्थेत आता ६२ महिला आहेत. येथे या महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. येथे त्यांना मैत्रिणी मिळतात. नृत्य संगीत योगा चित्रकला यांचे धडे त्यांना दिले जातात. त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो असे या संस्थेच्या पदाधिकारी श्रीमती साधना देशमुख यांनी सांगितले चेतना शंखपाळ आणि करुणा भिडे यांनीही संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. किशोर देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्वांनी यावेळी दिव्यांग महिलांशी संवादही साधला.प्रारंभी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष विजय बिरारी यांच्या हस्ते घरकुल परिवाराला मंडळातर्फे भरीव देणगीचा धनादेश श्रीमती साधना देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक मंडळाचे उपाध्यक्ष बी.बी.मोरे यांच्यातर्फे खाऊ आणि मिष्ठानाचे वाटप करण्यात आले. यावेळी अरुण कोरडे, संभाजी शेवाळे, मंगलाताई शेवाळे, मोहन चंगेडे, शरद मंडलिक, भगीरथ मंडलिक, शंकरराव खरात, मंदाकिनी खरात, अनुराधा देशपांडे, मीरा पाटील, प्रियदर्शन टांकसाळे, सोनवणे, जगन्नाथ बोडके आदी उपस्थित होते.

## म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचा वर्धापन दिन उत्साहात

**नाशिक ।** नाशिक म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचा ३१ वा वर्धापन दिन मनपा मुख्यालय कामगार सेना कार्यालयात संघटनेचे विद्यमान अध्यक्ष सुधाकर बडगुजर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी बडगुजर यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. दरम्यान कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व हिंदुरुदय सम्राट ठाकरे तसेच संघटनेचे माजी अध्यक्ष कै. अशोक काका गवळी यांच्या प्रतिमेस पदाधिकारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, वंदनीय हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने स्थापन झालेली म्युनिसिपल कर्मचारी-कामगार सेना, नाशिक या मान्यता प्राप्त संघटनेचा वर्धापन दिन आज साजरा करताना आनंद होत आहे. मी अध्यक्ष या नात्याने कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावत आहे. संघटनेच्या या कामाचा कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचा वातावरण आहे.या पुढेही कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी सदैव आम्ही लढा देत राहू असे यावेळी बडगुजर म्हणाले. यासाठी कर्मचाऱ्यांनी सुद्धा संघटनेची एकनिष्ठ राहिले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष नंदू गवळी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी किशोर कोठावळे, सोमनाथ कासार, तुषार ढकोलिया, रावसाहेब रुपवते, संजय गोसावी, रवींद्र येडेकर, उत्तम बिडगर विशाल घागरे प्रकाश उखाडे, राजू वर्मा, संदीप ढाकणे, आत्मज उपासने, मुकेश अहिरे, सतीश पागिरे, प्रकाश आगळे, अमित मकवाना, रवी गारे, अविनाश गांगुर्डे, गुलाम शेख, गणेश देवकर, रवींद्र जाधव, सागर साळवे, सुनील नागपुरे, अविनाश आरिगंळे, मिलिंद राजगुरू, धनंजय सोनवणे, त्र्यंबक खताडे, चेतन शिंदे, बाळासाहेब खैरनार, राजाराम गायकर उपस्थित होते. यावेळी संघटनेचे सभासद सदस्य व पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## ॲड. सचिन पाटील यांची मुंबई जिल्हा अनुशासन समितीवर नियुक्ती

**नाशिक ।** येथील सुप्रसिद्ध ॲड.सचिन सुदाम धारराव पाटील यांची वकिली व्यवसायातील दीर्घकालीन यशस्वी प्रॅक्टिस, या व्यवसायातील सर्वोच्च विशेषाधिकार आणि प्रतिष्ठा आदी बाबी विचारात घेऊन बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा या संघटनेच्या पालक सदस्य मंडळाने मुंबई जिल्हा शिस्तपालन त्रिसदस्य समितीवर नेमणूक केली. ॲड. धारराव पाटील हे व्यासंगी, समाजशील वृत्तीचे असून, ते बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा या संघटनेचे सक्रीय वकील आहेत.

नाशिक जिल्हयातून त्यांच्या बरोबरच ॲड. नागनाथ गोरवाडकर ॲड. मंदार भानोसे, ॲड. हर्षल केंगे यांची देखील जिल्ह्यांच्या शिस्तपालन समितीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्या नेमणूकीबद्दल बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, गोव्याचे सदस्य ॲड. जयंत जायभावे, ॲड. अविनाश भिडे, मविप्र समाजाचे सरचिटणीस व नाशिक बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, ॲड वैभव शेटे, ॲड.दिलीप वनारसे, ॲड. सुदाम गायकवाड ॲड.कैलास पाटील ॲड. जालिंदर ताडगे, ॲड. अजय तोष्णीवाल, ॲड. चंद्रकांत खुळे, ॲड. नंदकिशोर लाहोटी, ॲड. प्रवीण अमृतकर आदींनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला. सर्वांच्या नियुक्तीबद्दल नाशिक जिल्ह्यातील सर्व स्तरावरून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांचा धगधगता इतिहास उलगडणार

**नाशिक ।** ज्ञानवर्धिनी प्रसारक मंडळ व तळ्याची वाडी कृषी पर्यटन केंद्राच्या वतीने जगदंब क्रिएशन प्रस्तुत शिवपुत्र संभाजी महानाट्याचे आयोजन दि. ३० एप्रिल ते ५ मे दरम्यान नाशिकमध्ये तपोवन साधू ग्राम मैदानावर गोपाळ पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.



या महानाट्यात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रमुख भूमिका साकारणारे खासदार अमोल कोल्हे, डॉ.घनश्याम राव यांनी आज मुंबई ते जळगाव दौऱ्या दरम्यान नाशिक येथे भेट दिली असता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सभागृहात नाशिक शहरातील विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन शिवपुत्र संभाजी महानाट्य यशस्वी करण्याचे आवाहन केले. शिवपुत्र संभाजी महानाट्य हे ऐतिहासिक विचारांचे प्रगल्भ भांडार असून, लहान-थोरांपासून सर्वांनीच हे महानाट्य आवर्जून पहावे व छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत असलेला धगधगता इतिहास तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन उपस्थित सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना कोल्हे यांनी केले. प्रारंभी शिवपुत्र संभाजी महाराज यांचे नाशिकमध्ये सन २०२३ मध्ये पार पाडलेल्या महानाट्याच्या अनुभवाचे कथन समन्वयक योगेश कमोद यांनी केले. मागील वेळी सहा दिवस हे महानाट्य आयोजित केले असता नाशिककरांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादामुळे दोन दिवस डिमांड शो

### शिवपुत्र संभाजी महानाट्य

होऊन एकूण आठ दिवस हे महानाट्य यशस्वी करण्यासाठी ज्या ज्या संस्थांनी परिश्रम घेतले त्यांचे आभार देखील कमोद यांनी मांडले. यावेळी होणाऱ्या महानाट्यासाठी विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आत्तापर्यंत केलेल्या सहकार्यामुळे पन्नास टक्के पेक्षा अधिक तिकीट विक्री झाली असून, हे महानाट्य यशस्वी करण्यासाठी सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विविध सूचना मांडून त्या सूचना अमलात आणण्यासाठी आयोजक गोपाळ पाटील यांनी अमोल कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हे महानाट्य यशस्वी करणे क्रमप्राप्त असल्याचे सूचक उद्गार यावेळी काढले. यावेळी मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे, व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत धात्रक, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजेंद्र निकम, ग्लोबल एज्युकेशन संस्थेच्या संस्थापिका विजयालक्ष्मी मणेरीकर, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे शिक्षणाधिकारी जयंत ढोके, मानवधन शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष कोल्हे, हौसिंग फेडरेशनचे उत्तर महाराष्ट्राचे संचालक, मेडीकल असोसिएशिनच्य खजिनदार बोरसे, डॉ महाले, अखिल भारतीय मराठी नाटय संस्थेचे कार्यवाह सुनिल ढगे, स्याटरडे-संडे सायकलिस्ट क्लबच्या तृप्तीदा काटकर, बी.एन. आयचे अध्यक्ष सतीश पिसाळ, फ्रेंडस सर्कलचे जयप्रकाश जातेगावकर, योगेश आडभाई, अपूर्व पाटील आदींसह राजेश भुसारे , गिरीश गर्गे, विनायक शिंदे आदी उपस्थीत होते. यावेळी शिवपुत्र संभाजी महानाटयाच्या माहिती पुस्तकाचे अनावरण खासदार अमोल कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार प्रदर्शन नचिकेत पाटील यांनी केले.

## महत्त्वाचे

### सेंट पॅट्रिक चर्चमध्ये गुड फ्रायडेनिमित्त विशेष प्रार्थना सभा संपन्न

**देवळाली कॅम्प ।** 'गुड फ्रायडे' ही ख्रिश्चन धर्मीयांसाठी अत्यंत पवित्र आणि श्रद्धेची घटना आहे. येशू ख्रिस्ताच्या क्रूसावर बलिदान देण्याच्या



आठवणीप्रित्यर्थ ही घटना ईस्टरच्या आधीच्या शुक्रवारी साजरी केली जाते. याच निमित्ताने देवळाली कॅम्प येथील सेंट पॅट्रिक चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले. या दिवशी भाविकांनी चर्चमध्ये गर्दी करत श्रद्धेने येशू ख्रिस्ताच्या बलिदानाची आठवण काढली. प्रार्थना सभेत विशेष बायबल वाचन, स्तोत्र गायन तसेच येशूच्या क्रूसी फिक्शनवरील नाट्य सादर करण्यात आले. जे अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी ठरले. याआधी गुरुवारी सायंकाळी "मोनी थर्सडे" साजरा करण्यात आला. यावेळी चर्चचे फादर यांनी आपल्या १२ महिला शिष्यांचे पाय धुतले. या कृतीतून जगाला दया, करुणा व शांती यांचा संदेश देण्यात आला. स्थानिक ख्रिश्चन समुदायाने हा दिवस अत्यंत संयम, भक्तीभाव आणि शांततेने साजरा केला. समाजबांधवांच्या उपस्थितीत झालेल्या या प्रार्थना सभेमुळे भाविकांमध्ये विशेष भक्तिभाव आणि उत्साह दिसून आला.

### अतिक्रमण कारवाईने वाहतूक कोंडीत भर

**जुने नाशिक ।** काठे गल्ली ते नागजी सिग्नल मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात आल्याने काटे गल्ली सिग्नल द्वारका चौक नागजी सिग्नल नासरडी पूल अशा विविध भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. वाहन चालकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागले. काठे गल्ली सिग्नल परिसरातील धार्मिक स्थळाचे अतिक्रमण महापालिकेकडून हटविण्यात आले. कारवाई निमित्ताने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी काटेक अली सिग्नल ते नागजी सिग्नल पर्यंत मार्ग हा 18 एप्रिल पर्यंत वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. बुधवार तारीख 16 पहाटेपासून दुपारपर्यंत अतिक्रमण कारवाई सुरू होती. त्यातच मार्ग बंद आणि कारवाई यामुळे येथील वाहतूक द्वारका सिग्नलच्या दिशेने तसेच नागजी सिग्नलकडून येणारी वाहतूक वडाळा रोड भारत नगर तसेच वडाळा नाका मार्गे वळविण्यात आली होती. या भागातील इतरही सर्विस रोड बॅरिकेटिंग लावून बंद करण्यात आल्याने काटे गल्ली सिग्नल ते द्वारका सिग्नल मार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. वडाळा नाका नागजी सिग्नल आणि नासाडी पूल भागातही अशाच प्रकारे वाहतूक कोंडी झालेली दिसून आली. वाहतूक कोंडीमुळे भर उन्हात नागरिकांना बराच वेळ ताटकळत राहावे लागले वाहतूक कोंडीने वाहनांचा एकमेकांना धक्का लागल्याच्या कारणातून चालकांमध्ये वाद होण्याच्या घटनाही घडल्याचे दिसून आले. दुपारी तीन वाजेनंतर काही प्रमाणात वाहतूक सुरळीत झाली त्यामुळे वाहन चालकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. परिसरातील वाहन चालकांना मात्र अडकून राहण्याची वेळ आल्याने त्यांच्याकडून नाराजी व्यक्त करण्यात आली.

### सातपूर येथे भीम जन्मोत्सव समितीतर्फे महानाट्याचे आयोजन

**नाशिक ।** विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भीम महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदही महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध १५० कलाकारांचे महानाट्य दाखविण्यात येणार आहे. या महानाट्यात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाणा पर्यंतचे सर्वप्रसंग दाखवण्यात येणार आहेत.या कार्यक्रमात बैलगाडी, घोडे यासह अनेक नामवंत कलाकार महानाट्यात असणार आहेत. जतीन पाटील प्रस्तुत भव्य दिव्य महानाट्य क्रांतीसुर्य शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून नागरिकांनी महानाट्यला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. सदर कार्यक्रम अध्यक्ष माया काळे, भीम महोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष काळे, कार्याध्यक्ष भावेश पवार, उपाध्यक्ष हर्षदा दोंदे, खजिनदार काळू काळे यांच्या नेतृत्वात होणार आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अरुण काळे, रवी काळे, भिवानंद काळे, रवींद्र काळे, रमेश काळे, वसंत पंडित, नंदकुमार जाधव, राजाभाऊ सोनवणे, निलेश भंदुरे, बाळ निगळ, जगदीश काळे, श्याम काळे, मोगल काळे, हनुमंत काळे, विनोद काळे, शशिराज काळे, तुषार काळे, कुणाल काळे ,अमर काळे, सुनील काळे, अनिल काळे, हर्षद काळे सतीश काळे, पद्मराज काळे, मनोज मोकळे, राजू नेतावटे, महेंद्र पंडित, भीमा काळे सिद्धांत काळे, राजेश आवारे, राजू काळे इत्यादी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# बालांगण

## का लागते मुग्यांची रांग?



दोस्तांनो, तुम्ही मुंग्यांना रांगेत चालताना पाहिलं असेल. त्यांचं काम अगदी शिस्तीत सुरू असतं. आता या मुंग्या रांगेत का बरं चालत असतील? यामागचं तंत्र काय असेल असा प्रश्न तुम्हाला कधी ना कधी नक्कीच पडला असेल. चला तर मग, यामागचं कारण जाणून घेऊ. मुंग्या या सामाजिक सजीव आहेत. त्या वसाहती करून राहतात आणि संघटित सामाजिक आयुष्य जगतात. लाल मुंग्या घरातल्या भिंतींमध्ये घर करून राहतात. अन्नाच्या शोधासाठी त्या बरंच मोठं अंतर कापतात. घराकडे परतण्याचा मार्ग शोधण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही नकाशा नसतो. त्यामुळे त्यांना वेगळ्या तंत्राचा वापर करावा लागतो. अन्नाच्या शोधासाठी निघाल्यावर मुंग्या खूण म्हणून एक गंध सोडत जातात. या गंधामुळे त्यांना परतीचा मार्ग शोधता येतो. या मुंग्यांच्या प्रमुखाने सोडलेल्या गंधाचा माग काढत त्या चालतात. त्यामुळे त्या एका रांगेत चालतात. मुंग्यांचं हे तंत्र जाणून घेण्यासाठी तुम्ही छोटासा प्रयोग करू शकता. मुंग्यांची रांग दिसली की त्यांच्या मार्गावर खोडरबर घासा. यामुळे हा गंध निघून जाईल. खोडरबर घासलेल्या ठिकाणी आल्यावर मुंग्या गोंधळून जातील. त्यांना मार्ग मिळणार नाही. त्या इकडे-तिकडे पळू लागतील, मार्गापासून भरकटतील. आपण कोणत्या दिशेला जायचं हे त्यांना कळणारच नाही. त्यामुळे पुढच्या वेळी भरकटलेल्या मुंग्या दिसल्या की यामागचं कारण तुम्हाला कळलेलं असेल.

वाचा तर खरं

## ॲप्सच्या मदतीने हसतखेळत शिका...



छोट्या दोस्तांनो, सणासुदीचे दिवस संपून आता परीक्षेचे दिवस जवळ येऊ लागले आहेत. सणासुदीनंतर आणि गॅदरिंगच्या आधी होणाऱ्या या परीक्षा अगदी नकोशा वाटत असल्या तरी जोमाने अभ्यास करावाच लागतो. त्यामुळे तुम्हीही आता जोरदार तयारीला लागला असाल. सहसा शालेय अभ्यासामध्ये गणित आणि विज्ञान हे अभ्यासक्रमातले महत्त्वाचे आणि काहीसे अवघड विषय असतात. या दोन्ही विषयांमध्ये बरीच सूत्रं लक्षात ठेवावी लागतात. यासाठी तुम्हाला बरीच मेहनत करावी लागते. पण आता काही ॲप्सच्या मदतीने तुम्ही गणित आणि विज्ञानातली सूत्रं लक्षात ठेऊ शकता.

* मॅथ्स फॉर्म्युला फ्री हे ॲप शालेय विद्यार्थ्यांसोबतच कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त आहे. भूमिती, बीजगणितासोबत वरच्या वर्गातल्या गणिताची सूत्रं यात देण्यात आली आहेत. हे ॲप ३६ भाषांमध्ये उपलब्ध आहे.
* रसायनशास्त्रात चांगले गुण मिळवायचे असतील तर पिरियॉडिक टेबलची माहिती असणं गरजेचं असतं. पिरियॉडिक टेबल दर्शवणारी आणि वेळच्या वेळी अपडेट करणारी अनेक ॲप्स उपलब्ध आहेत.
* फॉर्म्युला लाईट या ॲपमध्ये गणितासोबतच रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयांमधली सूत्रं देण्यात आली आहेत. हे ॲप अगदी सोप्या पद्धतीने वापरता येईल. या तिन्ही विषयांशी संबंधित रंजक माहितीही या ॲपवर मिळू शकेल. मग काय मित्रांनो, या ॲप्सचा वापर करा आणि गणित, विज्ञानात चांगले गुण मिळवा!

## नव्या वर्षाच्या स्वागताआधी...

दोस्तांनो, २०२३ हे वर्ष आता संपत आलं. जवळपास महिन्याभरात आपण नवीन वर्षाचं स्वागत करायला सज्ज होणार. अशा वेळी सरत्या वर्षाचा आलेख मांडणं खूप महत्त्वाचं असतं. यामुळे आपल्याला वर्षभरात काय काय केलं याचा आढावा घेता येतो. आपण कोणत्या बाबतीत अग्रेसर आहोत, आपल्याला काय जमत नाही याचं अवलोकन केलं की पुढच्या वर्षीचे संकल्प करायला सोपं जातं. त्यामुळे नवीन वर्षाचे संकल्प करण्याआधी जरा थांबा, सरत्या वर्षाचा आढावा घेण्याची तयारी करा. यासाठी काय करावं लागेल? तर एक वही किंवा डायरी घेऊन त्यामध्ये प्रामाणिकपणे काही गोष्टी नमूद कराव्या लागतील. घरामध्ये असलेली एखादी कोरी वही घ्या. त्यामध्ये वेगवेगळे भाग पाडा. पहिल्या भागामध्ये वर्षभरात तुमच्यासोबत घडलेल्या सकारात्मक घटना लिहा. त्याचा तुमच्यावर काय परिणाम झाला हे लिहू शकता. वहीच्या दुसऱ्या भागात वर्षभरातील परीक्षेमध्ये किंवा इतर स्पर्धांमध्ये मिळालेल्या यशाविषयी लिहा. यामध्ये एखाद्या उपक्रमावर मिळालेला छानसा शेरा किंवा परीक्षेत वर्गात आलेला पहिला नंबर किंवा वक्तृत्व स्पर्धेत मिळालेलं यश यापैकी काहीही असू शकतं. अभ्यासासोबतच कला, क्रीडा या क्षेत्रांमध्येही तुम्ही पारंगत होत आहात याचा आत्मविश्वास तुम्हाला हे लिहिल्याने येईल. यामुळे नव्या वर्षामध्ये अभ्यासावर आणि इतर कोणत्या उपक्रमावर लक्ष केंद्रित करायचं आहे हे ठरवणं सोपं जाईल. वहीच्या तिसऱ्या भागात तुम्हाला वर्षभरात जाणवलेल्या त्रुटींविषयी लिहा. यामध्ये वर्षभरात तुमच्याकडून झालेल्या चुका प्रामाणिकपणे लिहा. याचे दोन फायदे होतील. एक म्हणजे तुम्हाला प्रामाणिकपणे चुका कबूल करण्याची सवय लागेल आणि दुसरं म्हणजे या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रयत्न करता येतील. वहीच्या चौथ्या भागात तुमच्या छंदांविषयी माहिती लिहा. तुम्ही आत्ता जोपासता ते छंद आणि पुढच्या वर्षभरात जोपासायची इच्छा असलेले छंद अशी एक यादी तुम्हाला या भागात करता येईल. हे छंद जोपासण्यासाठी वर्षभरात किती वेळ द्यावा लागेल याचा अंदाज घेता येईल. वहीच्या पाचव्या भागात तुम्ही वर्षभरात केलेली प्रवासवर्णनं लिहा. तुम्हाला आवडलेल्या चित्रपटांविषयीही लिहू शकता. वहीचा पाचवा भाग कोणत्याही विषयावर लिहिण्यासाठी ठेऊ शकता. अशा पद्धतीने नवीन वर्षाचं स्वागत करण्याच्या आधी पूर्वतयारी करा.

वेगळं काही

## वजन किती असायला हवं?



आता डाएटिंगचं फॅड तुमच्यासारख्या छोट्यांपर्यंत येऊन पोहोचलं आहे! जाहिराती, चित्रपटांमधल्या कलाकारांना बघून आपणही त्यांच्यासारखंच बारीक असायला हवं, अशी मानसिकता तयार होऊ लागली आहे. यात लहान मुलंही मागे नाहीत. त्यामुळे आपलं वजन किती असायला हवं, असा प्रश्न उपस्थित होतो. बारीक असणं हे निरोगीपणाचं लक्षण असू शकतं का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. प्रत्येक माणसाची शारीरिक ठेवण वेगवेगळी असते. प्रत्येकाच्या गरजाही वेगळ्या असतात. त्यामुळे खूप बारीक असणंही चांगलं नसतं. बारीक राहण्यासाठी तुम्ही खूपच कमी खात असाल तर ते चुकीचं आहे. अन्न हे आपल्या शरीराचं इंधन असतं. अन्नातल्या पोषक घटकांमुळे आपल्याला ऊर्जा मिळते. यामुळेच आपण वेगवेगळी कामं करू शकतो. जास्त बारीक असणं जसं चांगलं मानलं जात नाही तसंच खूप जाडही असू नये. वजन नियंत्रणात असणं गरजेचं असतं. तुमचं वय वाढत असतं. त्यामुळे शरीराला पोषक घटकांची आवश्यकता असते. म्हणूनच संतुलित आहार गरजेचा मानला जातो. फळं आणि भाज्या आरोग्यादायी असतात. त्यांचा समावेश आहारात करायला हवा. वडा पाव, पिझ्झा, बर्गरसारखं जंक फूड बाजूला सारायला हवं. प्रत्येकाच्या शारीरिक ठेवणीनुसार त्यांचं वजन ठरतं. वजन किती असायला हवं हे उंचीनुसारही ठरवलं जातं. त्यामुळे लहान वयात वजनाची काळजी करायची तुम्हाला काहीच गरज नाही. शरीराला बळ देणारे पदार्थ खा आणि मस्त रहा.

जपा आरोग्य

चित्र रंगवा



## मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात



विविध कंपन्या बाजारपेठा काबीज करण्याच्या प्रयत्नात असतात. कोणतं उत्पादन कधी बाजारात आणायचं, त्याचा ग्राहकवर्ग कोणता, उत्पादन कोणत्या पद्धतीने सादर करायचं याचं संशोधन करावं लागतं. याला मार्केट रिसर्च असं म्हटलं जातं. या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. मार्केट रिसर्चची विभागणी तीन प्रकारांमध्ये करण्यात आली आहे. संशोधन, फिल्ड वर्क आणि डाटा विश्लेषण असे हे तीन प्रकार होत. संशोधन या विभागात बाजारपेठेशी संबंधित समस्यांचा शोध घेऊन माहिती जमवावी लागते. संशोधनाचे अहवाल आणि प्रस्ताव तयार करण्याची जबाबदारीही याच लोकांवर असते. फील्ड वर्क अंतर्गत फोन, सोशल मिडियाच्या माध्यमातून किंवा घरोघर जाऊन सर्वेक्षण केलं जातं तर जमवलेल्या माहितीचा अभ्यास आणि विश्लेषण करून निष्कर्ष काढला जातो. मार्केट रिसर्चच्या क्षेत्रात विविध संस्था काम करत असतात. जगभरातल्या कंपन्या बाजारपेठेच्या माहितीसाठी या कंपन्यांची मदत घेतात. अशा कंपन्यांमध्ये तुम्ही विविध पदांवर नोकरी करू शकता. सरकारी क्षेत्रामध्येही बऱ्याच संधी आहेत. मार्केटिंग हा विषय घेऊन एमबीए केल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात काम करू शकता.

कोण होणार?

## शरीरातील ऊर्जेचा असाही वापर!




माणसाच्या शरीरात प्रचंड ऊर्जा असते. या ऊर्जेचा वापर चांगल्या कामासाठी करता आला तर? यातून काही तरी चांगलं घडलं तर? हाच विचार शास्त्रज्ञांनी केला आणि मानवी शरीरातल्या ऊर्जेचा वापर करून गॅझेट्स चार्ज करू शकणाऱ्या टॅबची निर्मिती झाली. हा टॅब धातूपासून बनवण्यात आला आहे. अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटी ऑफ बफेलोच्या शास्त्रज्ञांनी हा टॅब तयार केला आहे.

एखादी वस्तू दुसऱ्या वस्तूच्या संपर्कात आल्यानंतर उत्तेजित होऊन ट्रायबोइलेक्ट्रिसिटीची निर्मिती करते. ट्रायबोइलेक्ट्रिसिटीचा वापर करण्यासाठी नॅनो जनरेटरची गरज असते. हा जनरेटर तयार करणं खूप कठिण आणि महाग असतं. पण या टॅबमुळे हा प्रश्न निकाली निघाला आहे. या टॅबमध्ये सोन्याच्या दोन पातळ पट्ट्यांच्या मध्ये पॉलिमर बसवण्यात आलं आहे. सोन्याच्या एका पट्टीची रचना वेगळ्या पद्धतीने करण्यात आली आहे. यामुळे ही पट्टी थोडी उंच वाटते. शारीरिक हालचालीमुळे या टॅबवर दाब पडतो. यामुळे सोनं आणि पॉलिमर यांच्यात घर्षण निर्माण होतं. या घर्षणामुळे सोन्याच्या दोन पट्ट्यांदरम्यान इलेक्ट्रॉनचा वावर वाढल्याने विजेची निर्मिती होते. यातून १२४ वोल्टची वीज उत्पन्न होते. एवढ्या विजेमुळे ४८ एलईडी दिवे एकत्रितपणे पेटू शकतात. या उपकरणात सोन्याची मोठी पट्टी बसवून जास्तीत जास्त विजेची निर्मिती करण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. तसंच या टॅबमधून उत्पन्न होणारी वीज बॅटरीमध्ये साठवून ठेवण्यासाठीचं तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

स्मार्ट टेक

## काडेपेटीचा रोबो



दोस्तांनो, घरातल्या काड्याच्या पेट्या तुम्ही कचऱ्यात टाकून देता. पण याच काडेपेट्यांचा वापर करून तुम्ही वेगवेगळ्या कलाकृती तयार करू शकता. काडेपेट्यांच्या मदतीने रोबो कसा तयार करायचा हे पाहु...

**साहित्य:** चार काडेपेट्या, काडेपेटीच्या काड्या, लाल, पिवळ्या किंवा तुमच्या आवडीच्या रंगांचे कागद, गम, कात्री

**कृती:** रंगीत कागदावर काडेपेटी ठेऊन तिच्या आकाराचे कागद कापून घ्या. आता हे कागद काडेपेटीवर चिकटवून घ्या. ही काडेपेटी म्हणजे रोबोचं तोंड असेल. एक काळा कागद घ्या. त्यापासून डोळ्यांचा आकार कापून घ्या. डोळ्यांच्या जागी हे आकार चिकटवा. रंगीत कागदापासून तोंडाचा आकार कापून तोही चिकटवा. आता उरलेल्या तीन काडेपेट्या घ्या. त्यांनाही रंगीत कागद चिकटवून घ्या. रोबोचं तोंड असलेली काडेपेटी उभी धरून वरच्या बाजूला दोन काड्या अडकवा. या काड्या म्हणजे रोबोची अँटिना असेल. आता तीन काडेपेट्यांपैकी एक आडवी धरून उरलेल्या दोन काडेपेट्या खालच्या बाजूला उभ्या चिकटवून घ्या. या काडेपेट्या म्हणजे रोबोचे पाय. रोबोचं तोंड असलेल्या काडेपेटीच्या खालच्या बाजूला छिद्र पाडा. तसंच आडव्या ठेवलेल्या काडेपेटीच्या मध्यभागी छिद्र पाडा. यात एक काडी अडकवा. यामुळे रोबोचं तोंड हलेल. झाला तुमचा रोबो तयार.

करून तर पहा

## तुम्हीच करा ट्रिप प्लॅन!

मुलांनो, तुम्हाला आता लवकरच नाताळच्या सुट्ट्या लागतील ना? या सुट्ट्यांमध्ये मस्त चार पाच दिवस फिरायला जाण्याचा प्लॅन असेलच ना? पण यावेळी काहीतरी वेगळं करून बघा. यावेळी आईबाबांकडे हट्ट धरण्याऐवजी तुम्हीच ट्रिप प्लॅन करा. सगळ्यात आधी सर्वांच्या सुट्ट्यांच्या तारखा जाणून घ्या. त्या तारखांमधून सर्वांना जमतील असे दोन-चार दिवस निवडा.



आईवडिलांकडून बजेटची माहिती घ्या. एकदा ट्रिपचं बजेट समजल्यावर त्यानुसार ठिकाण आणि हॉटेल शोधणं सोपं जाईल. यासाठी ट्रिप ॲडव्हायजर, मेक माय ट्रिप, गो आयबिबो, बुकिंग डॉट कॉम अशा ॲप्सची मदत घेता येईल. या ॲप्सवर हॉटेल कुठे आहे, मेन रस्त्यापासून किती आतमध्ये आहे, वाहतुकीच्या सुविधा कोणत्या आहेत हे सर्व नमूद केलेलं असतं. तसंच हॉटेलमध्ये कोणत्या सुविधा आहेत हेही नमूद केलं असेल. त्यानुसार तिथे वायफायसोबतच आणखी किती सुविधा आहेत हेही तपासून घ्या. कुठे राहायचं हे शॉर्टलिस्ट झाल्यावर आईबाबांचा सल्ला घ्या. हॉटेलचं बुकिंग करण्याआधी तिथे जाणाऱ्या ट्रेन आणि बसची चौकशी करा. प्रवास सोयीस्कर होणं महत्त्वाचं असतं. बस किंवा ट्रेन स्टेशनपासून राहण्याचं ठिकाण लांब असेल तर जाण्यायेण्यात अनावश्यक वेळ वाया जाऊ शकतो. त्यामुळे हॉटेल बुक करण्याआधी याचा विचार करा. पर्यटन स्थळांची यादी करा. तुमच्याकडे असणारा वेळ आणि पर्यटन स्थळं यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करा. कोणतंही बुकिंग करण्याआधी आईबाबांचा सल्ला घ्या. ज्या ठिकाणी जाणार आहात तिथला अभ्यास करून जा म्हणजे प्रवासाचा आणि ट्रिपचा मनमुराद आनंद लुटता येईल.

फन टाईम

## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक द्विशतकं झळकावणारा खेळाडू कोण?
२) दुबईत नुकत्यात सुरू झालेल्या जगातल्या सर्वात उंच हॉटेलचं नाव काय?
३) फॅथोमीटरने काय मोजलं जातं?
४) अंदमान बेटांच्या जवळ असलेला देश कोणता?
५) एमएस वर्ड काय आहे?
६) केंद्रिय अर्थसंकल्प सर्वात आधी कुठे सादर केला जातो?
७) भारताचं सर्वात पूर्वेकडचं राज्य कोणतं?
८) आवाज न करणारा प्राणी कोणता?
९) डीआरडीएचं पूर्णरूप काय?
१०) इंटरनेटचं पूर्ण रूप काय?

उत्तरं : १) रोहित शर्मा २) गेव्होरो ३) समुद्राची खोली ४) म्यानमार ५) ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर ६)लोकसभेत ७) अरूणाचल प्रदेश ८) जिराफ ९) डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ॲथोरिटी १०) इंटरनॅशनल नेटवर्क

## ठिपके जुळवा



### दोस्त हे मस्त


## गमती जमती प्राण्यांच्या



माणसाप्रमाणे गोरीलालाही सर्दी होते. तसंच त्यांना इतर आजारही होऊ शकतात. शहामृग घोड्यापेक्षा वेगाने पळू शकतं. तर नर शहामृग सिंहासारखी गर्जना करू शकतं. शरीराचा तोल सांभाळण्यासाठी कांगारू शेपटीचा वापर करतात. गायी उभ्या उभ्या झोपू शकतात पण बसून झोपल्यावरच त्यांना स्वप्नं पडतात.

### खादाडी

## कच्च्या तिळाच्या वड्या



आईला स्वयंपाकात मदत करताना तुम्ही तिळापासून छान चविष्ट पदार्थ बनवू शकता. यासाठी दोन कप तीळ, एक कप बेदाणे, अर्धा कप किसलेलं सुकं खोबरं, अर्धा कप जवस, अर्धा कप तूप, पाव कप खोबरेल तेल, एक टी स्पून व्हॅनिला इसेन्स, पाऊण चमचा मीठ हे साहित्य घ्या. सर्व कोरडे पदार्थ एका मोठ्या भांड्यात एकत्र करा आणि मिसळून घ्या. आता त्यात तेल, बटर तसंच इतर पदार्थ घाला. हलवून घ्या. आता एखाद्या ट्रेमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. नीट दाबून बसवा. हा ट्रे फ्रीजरमध्ये ठेवा. थंड झाल्यावर त्याच्या वड्या तयार होतील. भूक लागली की या वड्या खा.

### लाईफस्टाईल

## ड्रायरचा वापर करताना...



दोस्तांनो, मॉलमध्ये किंवा हॉटेलमध्ये स्वच्छतागृहात गेल्यावर हात वाळवण्यासाठी ड्रायर असतो. या ड्रायरखाली हात धरल्यावर मस्त गरम हवा येते. तुम्हीही मग त्याखाली हात धरता. पण या ड्रायरमुळे रोग होण्याची शक्यता असते. ड्रायरमध्ये असंख्य बॅक्टेरिया असतात. हे बॅक्टेरिया तुमच्या हाताला चिकटून तोंडात जाऊ शकतात. त्यामुळे पुढच्या वेळी अशा ड्रायर्सचा वापर करताना काळजी घ्या

### योगा टाईम

## थायरॉइड टाळण्यासाठी...



थायरॉइड ही सध्याच्या काळातली सर्वसाधारण समस्या झाली आहे. सेतूबंधासन करून थायरॉइडला लांब ठेवता येतं. हे आसन करण्यासाठी पाठीवर झोपा. गुडघे दुमडून घ्या. दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवा. आता शरीराला वर उचलायचं आहे. श्वास घ्यायला सुरूवात करा. पाठीचा खालचा भाग आधी वर उचला मग मधला आणि मग वरचा भाग वर घ्या. यूट्यूबवर बघून तुम्ही हे आसन करू शकता.

# भारतात 'टेस्ला'ची एंट्री कन्फर्म!

## पंतप्रधान मोदी यांचा एलन मस्क यांना फोन



**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्था**

अमेरिकेने अनेक देशांवर टॅरिफ लागू केले आहे. या दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टेस्ला, एक्स कंपन्यांचे मालक एलन मस्क यांच्याशी फोनवरून संवाद साधला. पीएम मोदींनी स्वतः X वर पोस्ट करत ही माहिती दिली आहे. त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, "त्यांनी मस्क यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टन डीसी येथे झालेल्या त्यांच्या भेटीदरम्यान ज्या मुद्द्यांवर चर्चा झाली, तेच मुद्दे फोनवर बोलताना पुन्हा चर्चेत आले".

पुढे PM मोदी यांनी म्हटले आहे की, "मी एलन मस्क यांच्याशी बोललो. या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टन डीसी येथे झालेल्या आमच्या बैठकीत आम्ही ज्या विषयांवर चर्चा केली त्यासह विविध मुद्द्यांवर चर्चा केली. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य कसे वाढवायचे यावर विचारमंथन झाले. भारत आणि अमेरिका यांच्यातील तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या क्षेत्रात सहकार्याच्या अफाट शक्यतांवर मस्क आणि त्यांच्यात चर्चा झाल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. या क्षेत्रांमध्ये अमेरिकेसोबतची भागीदारी आणखी वाढवण्यासाठी भारत वचनबद्ध आहे".

फेब्रुवारीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर गेले होते. या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत अमेरिकेचे अब्जाधिश उद्योगपती एलन मस्क यांनादेखील भेटले होते. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदी ट्रम्प यांच्या आधीही मस्क यांना भेटले. या प्रकरणाची माध्यमांमध्ये बरीच चर्चा झाली. या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी विशेषतः एलन मस्क यांच्या मुलांशी संवाद करताना दिसले होते. यावेळी दोघांमध्ये नवोन्मेष, अवकाश संशोधन आणि टेस्लाच्या विस्तार योजनांवर चर्चा झाली होती.

**टेस्ला भारतात ३ ते ५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार**

मस्क यांची टेक कंपनी टेस्ला भारतात प्रवेश मिळवण्यासाठी वेगाने पावले उचलत आहे. या पार्श्वभूमीवर टेस्लाचे अधिकारी लवकरच भारतात येतील. एलन मस्क यांच्या टेस्लाला आयात शुल्कात सूट मिळविण्यासाठी भारत सरकारच्या योजनेअंतर्गत अर्ज करावा लागेल. यासोबतच, सरकारी सूत्रांवर विश्वास ठेवायचा झाला तर, टेस्लाने उत्पादनासाठी गुजरातसह महाराष्ट्रातील चाकण आणि छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) हे आवडते ठिकाण म्हणून निवडले आहे. एलन मस्क यांची इलेक्ट्रिक कार कंपनी टेस्ला भारतात ३ ते ५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करू शकते, असे देखील मानले जाते.


# आता सूनच नाही तर सासूलाही करता येणार कौटुंबिक हिंसेविरोधात तक्रार, हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**प्रयागराज, दि. १८ वृत्तसंस्था**

कुटुंबांमध्ये सासू-सुनेमध्ये होणारे वादविवाद, भांडण ही आपल्याकडील सामान्य बाब आहे. मात्र कधीकधी असे वाद विकोपाला जाऊन त्यातून गंभीर गुन्हे घडतात. काही कुटुंबांमध्ये सासू आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या छळामुळे सुनांकडून टोकाचं पाऊल उचलण्यासारखे प्रकारही घडतात. तर आता बदललेला काळ आणि कुटुंब व्यवस्थेत झालेल्या परिवर्तनानंतर काही सुनांकडून सासूचा छळ होत असल्याच्याही घटना समोर येत आहेत. दरम्यान, सुनांकडून छळ होणाऱ्या सासूला कायदेशीर दाद मागण्याचा, छळाविरोधात आवाज उठवण्याचा अधिकार आहे की नाही, असा प्रश्न मागच्या अनेक दिवसांपासून उपस्थित केला जात होता. या प्रश्नाचं उत्तर आता अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलं आहे. सासूसुद्धा कौटुंबिक हिंसेविरोधात दाद मागून केस दाखल करू शकते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने याबाबत दिलेल्या आपल्या एतिहासिक निर्णयामध्ये सांगितले की, कौटुंबिक हिंसाचार विरोधा कायदा हा केवळ सुनांच्या सुरक्षेपुरता मर्यादित नाही. सासूसुद्धा या कायद्यांतर्गत तक्रार नोंदवू शकते, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. एका सासूने तिच्या सुनेविरोधात कौटुंबिक हिंसाचाराप्रकरणी तक्रार नोंदवली होती, तर सुनेने याला आक्षेप घेत सासूविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

या सुनावणीवेळी सासू सुनेविरोधात अशा प्रकारची तक्रार नोंदवू शकते का? असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावर सुनावणी करताना हायकोर्टाने त्याला परवानगी दिली. या प्रकरणात पीडित सासूने तिच्या सुनेविरोधात कौटुंबिक



हिंसाचारविरोधी अधिनियम २००५ अन्वये तक्रार नोंदवू शकते, असे सांगितले. हा निर्णय न्यायमूर्ती आलोक माथूर यांनी जाहीर केला. त्यांनी लखनौमधील एका कनिष्ठ न्यायालयाने पीडित सासू आणि तिच्या कुटुंबीयांविरोधात बजावण्यात आलेले समन्स योग्य असल्याचा निर्णय दिला.

या प्रकरणात सासूने केलेल्या आरोपानुसार तिची सून तिच्या मुलावर आपल्या माहेरी येऊन राहण्यासाठी दवाब आणत होती. त्याशिवाय सदर सुनेने सासू आणि सासऱ्यांसोबत गैरवर्तन केल्याचा आणि खोट्या खटल्यामध्ये अडवण्याची धमकी दिल्याचाही आरोप सासूने केला आहे. दरम्यान, सासूच्या वतीने देण्यात आलेली ही तक्रार सुनेने नोंदवलेल्या हुंड्यासाठी छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारीचा बदला घेण्यासाठी करण्यात आली होती, असा दावा सुनेच्या वकिलाने केला आहे.

अखेरीस दोन्ही पक्षांचा युक्तिवाद एकल्यानंतर अलाहाबाद हायकोर्टाने सासूने नोंदवलेली तक्रार ही प्राथमिक दृष्ट्या कौटुंबिक हिंसाचार कायद्यातील कलम १२ अंतर्गत येते असा निर्णय दिला. तसेच कनिष्ठ न्यायालयाने सुनेविरोधात बजावल्ले समन्स वैध ठरवले.

# कामावर ठेवलेला पोरगाच मालकाच्या पत्नीला पळवून घेऊन गेला

**नोएडा, दि. १८ वृत्तसंस्था**

नुकतीच सासू आणि होणाऱ्या जावयाचा पळून जाण्याची घटना प्रचंड व्हायरल झाली होती. या दोघांना नेपाळच्या सीमेवरून ताब्यात घेण्यात आले असताना आता बिर्याणीवाल्यासोबत अशीच घटना घडली आहे. बिर्याणीवाल्याकडे कामाला असलेल्या तरुणाने मालकाच्याच पत्नीला पळवून नेल्याची घटना घडली आहे.

ग्रेटर नोएडामध्ये बिर्याणीचा स्टॉल होता, त्याच्या मालकाने एका तरुणाला तिथे कामाला ठेवले होते. त्याची रहायची व्यवस्था देखील त्याने आपल्याच घरात केली होती. या तरुणाने मालकाच्याच पत्नीसोबत प्रेमसंबंध जुळविले. हे तिघेच या घरात राहत होते. तरुणाने मालकाच्या पत्नीला पळवून नेले, यामुळे मालकाला धक्का बसला होता.

तो कामगार तरुण आणि मालकाची पत्नी तीन दिवस एकत्र राहिले होते. तीन दिवस राहुन झाल्यानंतर तरुण मालकाच्या पत्नीला तिच्या घरी सोडायला आला. तेव्हा मालकाने त्यांना पकडले आणि चांगले धु-धु धुतले. मालकाचा मार खाल्ल्यानंतर आता हा तरुण दिल्लीच्या रुग्णालयात उपचार घेत आहे. पोलिसांनी बिर्याणी स्टॉल मालक आणि त्याच्या वडिलांवर गुन्हा दाखल केला आहे.

१ एप्रिल रोजी काम करणारा तरुण त्याच्या मालकाच्या पत्नीसोबत घरातून पळून गेला होता. तिघेही एकाच घरात भाड्याने राहत होते. १५ एप्रिलला त्याला पत्नीला घरी सोडताना पकडले. मालकाने व त्याच्या वडिलांनी त्याला दांड्याने मारहाण केली. यात त्या तरुणाला गंभीर दुखापत झाली. त्याची प्रकृती बिघडल्याने त्याच्या कुटुंबीयांनी त्याला दिल्ली रुग्णालयात दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# पैसे, दारुच्या बदल्यात मतदान करणारे पुढच्या जन्मात उंट, मेंढ्या, कुत्रे, मांजर बनतील

**इंदूर, दि. १८ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातीलभाजपा आमदार आणि माजी मंत्री उषा ठाकूर यांनी पैसे, दारू आणि गिफ्ट्सच्या बदल्यात मतदान करणाऱ्यांना फटकारलं आहे. लोकशाही विकणारे लोक उंट, मेंढी, बकरी, कुत्रा आणि मांजर म्हणून पुनर्जन्म घेतील असं म्हटलं आहे. इंदूरच्या महू विधानसभा मतदारसंघातील हसलपूर गावात झालेल्या सभेत महिला आमदाराच्या विधानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला.



लोकशाहीचं रक्षण करण्याचं आवाहन करताना भाजपाच्या आमदार म्हणाल्या की, "लाडली बहना योजना आणि किसान सन्मान निधीसारख्या भाजपा सरकारच्या विविध योजनांमधून प्रत्येक लाभार्थ्यांच्या खात्यात हजारो रुपये येतात. यानंतरही जर मतं १,०००-५०० रुपयांना विकली गेली तर ती माणसांसाठी एक लाजिरवाणी बाब आहे."

"देव पाहत आहे, मतदान करताना तुमचा प्रामाणिकपणा गमावू नका. पैसे, साडी, ग्लास आणि दारू घेऊन तटस्थ झालेल्यांनी त्यांच्या डायरीत लिहावं की, ते पुढच्या आयुष्यात नक्कीच उंट, मेंढी, बकरी, कुत्रा आणि मांजर बनतील. जे लोकशाही विकतील ते हेच होतील. हे लिहून ठेवा. माझा देवाशी थेट संवाद आहे, माझ्यावर विश्वास ठेवा."

"राष्ट्र, धर्म आणि संस्कृतीची सेवा करणाऱ्या भाजपालाच मतदान करावं. लोकशाही हे आपलं जीवन आहे. संविधानातील तरतुदींनुसार सरकार लोकांचं जीवन सुधारण्यासाठी अनेक योजना राबवतं. ते वर्षाचे १२ महिने जनतेची सेवा करतात. अशा परिस्थितीत, निवडणुकीदरम्यान कोणत्याही परिस्थितीत जर एखाद्या व्यक्तीने पैसे, दारू किंवा इतर साहित्यासाठी आपलं मत विकलं तर तो अक्षम्य गुन्हा आहे. आपल्या कर्माच्या आधारे आपल्याला पुढचा जन्म मिळतो. जर आपलं कर्म वाईट असेल तर आपण माणूस म्हणून पुनर्जन्म घेणार नाही" असंही उषा ठाकूर यांनी म्हटलं आहे.

# आंध्रचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर ईडीची मोठी कारवाई

**हैदराबाद, दि. १८ वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर ईडीकडून आज मोठी कारवाई करण्यात आली. सुमारे १४ वर्षे जुन्या मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडी ने जगन रेड्डी यांची ८०० कोटी रूपयांची जमीन मालमत्ता आणि शेअर्स जप्त केले आहेत.



सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद युनिटने आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांचे २७.५ कोटी रुपयांचे शेअर्स तात्पुरते जप्त केले आहेत. वायएसआर काँग्रेस पक्षप्रमुखांच्या शेअर्ससह, केंद्रीय एजन्सीने त्याच प्रकरणात दालमिया सिमेंट्स (भारत) लिमिटेड (डीसीबीएल) यांच्या मालकीची ३७७.२ कोटी रुपयांची जमीनदेखील जप्त केली आहे. ईडीने जप्त केलेली मालमत्ता ७९३.३ कोटी रुपयांची असल्याचेदेखील डीसीबीएलने म्हटले आहे.

मनी लाँड्रिंग प्रकरणात खटला दाखल झाल्यानंतर १४ वर्षांनी हे कायदेशीर पाऊल उचलण्यात आले आहे. ईडीने केलेली तात्पुरती जप्ती २०११ मध्ये केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) पहिल्यांदा नोंदवलेल्या एका प्रकरणाशी जोडली आहे. हा खटला डीसीबीएलच्या भारती सिमेंट कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये केलेल्या गुंतवणुकीशी संबंधित आहे. डीसीबीएलला १५ एप्रिल रोजी ईडीचा जप्तीचा आदेश मिळाला, जो ३१ मार्च रोजी जारी करण्यात आला होता. डीसीबीएलने मूळतः खरेदी केलेल्या जमिनीची किंमत ३७७ कोटी रुपये होती.

सीबीआय आणि ईडीच्या तपासात असे आढळून आले की, "डीसीबीएलने यापूर्वी जगन रेड्डी यांच्याशी संबंधित कंपनी रघुराम सिमेंट्स लिमिटेडमध्ये ९५ कोटी रुपये गुंतवले होते. त्या बदल्यात असा आरोप आहे की, जगन रेड्डी यांनी त्यांचे वडील, तत्कालीन मुख्यमंत्री वायएस राजशेखर रेड्डी यांच्यावर प्रभाव टाकून डीसीबीएलला कडप्पा जिल्ह्यात ४०७ हेक्टर खाण भाडेपट्टा मिळवून देण्यात मदत केली. हा करार लाचलुचपत प्रतिबंधक म्हणून वर्णन केला जातो.

# 1971 च्या नरसंहाराबद्दल माफी मागा, 4.3 अब्ज डॉलर्स भरपाई द्या; बांगलादेशाची पाकिस्तानकडे मागणी

**ढाका, दि. १८ वृत्तसंस्था**

बांगलादेशने १५ वर्षांनंतर द्विपक्षीय चर्चेत पाकिस्तानसोबत एतिहासिक न सुटलेले मुद्दे उपस्थित केले. दोन्ही देशांच्या परराष्ट्र कार्यालयांमधील या बैठकीत बांगलादेशने १९७१ च्या मुक्ती युद्धादरम्यान त्यांच्या सैन्याने बांगलादेशी नागरिकांच्या (तत्कालीन पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक लोक) नरसंहाराबद्दल पाकिस्तानने जाहीर माफी मागण्याची मागणी केली. त्याचबरोबर ४.५ अब्ज रुपयांच्या थकबाकीच्या रकमेचा मुद्दाही उपस्थित केला. या बैठकीत दोन्ही देशांचे परराष्ट्र सचिव सहभागी झाले होते.

बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीम उद्दीन यांनी परराष्ट्र मंत्रालयात पत्रकारांशी बोलताना सांगितले की, पाकिस्तानसोबतच्या आमच्या द्विपक्षीय संबंधांसाठी हे मुद्दे सोडविणे गरजेचे आहे. आम्ही १९७१ च्या अत्याचारांसाठी सार्वजनिक माफी मागण्यासह पाकिस्तानसमोर ४.३२ अब्ज डॉलर्सचा आर्थिक दावाही ठेवला आहे. यामध्ये १९७१ च्या युद्धादरम्यान बांगलादेशात अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांना परत आणणे आणि १९७० च्या चक्रीवादळासाठी परदेशी मदत म्हणून मिळालेल्या पैशाचा समावेश होता.

चर्चेदरम्यान पाकिस्तानच्या प्रतिसादाबद्दल विचारले असता, बांगलादेशच्या परराष्ट्र सचिवांनी सांगितले की, त्यांनी या मुद्द्यांवर चर्चा सुरू ठेवण्याची तयारी दर्शविली आहे. या चर्चेत पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच उपस्थित होत्या. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार २७-२८ एप्रिलरोजी बांगलादेशला भेट देणार असल्याची माहितीही जशीम उद्दीन यांनी दिली. २०१२ नंतर पाकिस्तानी परराष्ट्रमंत्र्यांचा हा पहिलाच अधिकृत दौरा असेल. पाकिस्तान आणि बांगलादेश दरम्यान थेट विमानसेवा सुरू करण्याबाबतही चर्चा झाली.

१९७१ पूर्वीच्या पाकिस्तानी मालमत्तेमध्ये ४.५२ अब्ज डॉलर्सचा वाटा असल्याचा दावा बांगलादेशने केला होता, ज्यामध्ये परदेशी मदत, थकबाकी असलेला भविष्य निर्वाह निधी आणि बचत योजनांचा समावेश होता. १९७१ मध्ये पाकिस्तानपासून वेगळे झाल्यानंतर बांगलादेश (तेव्हाचे पूर्व पाकिस्तान) एक स्वतंत्र राष्ट्र बनले. पाकिस्तानी सैन्याने पूर्व पाकिस्तानमध्ये भयानक अत्याचार केले होते. त्यात लाखो लोक मारले गेले आणि महिलांवर बलात्कार झाले. त्यानंतर भारताने हस्तक्षेप करत पाकिस्तानी सैन्याशी युद्ध करून बांगलादेश मुक्त केला.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये भारताचे दखलपात्र यश

**खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकी विषयात जगभरातील हुशार विद्यार्थ्यांमधून भविष्यातील खगोल शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत याच दृष्टिकोनातून दरवर्षी जगभरातील विविध देशामध्ये खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकी ऑलिम्पियाड चे आयोजन करण्यात येते. यंदाचे आंतरराष्ट्रीय आय व ए ए स्पर्धेचे यजमानपद मुंबईतील होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एजुकेशन व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेंटर याना मिळाले आहे. आजही राज्यातील बहुतांश शाळांमध्ये या स्पर्धेबद्दल अनभिज्ञता आहे. याच निमित्ताने या स्पर्धेचे मार्गदर्शक आदित्य देसाई यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

१] खगोल भौतिकी आणि ऑलिम्पियाड स्पर्धेचे स्वरूप नेमके काय असते?

आंतरराष्ट्रीय स्तरावरील हि स्पर्धा सध्या एकूण ११ विषयामध्ये होते. गणित, भौतिक शास्त्र, रसायन शास्त्र, माहितीशास्त्र, जीवशास्त्र, तत्वज्ञान, भूगोल, भाषा शास्त्र, पृथ्वी विज्ञान कनिष्ठ विज्ञान, खगोल शास्त्र आणि खगोल भौतिकी अशा ११ विषयात हि स्पर्धा घेतली जाते. या परीक्षेत सदर विषयातील अत्यंत कठीण प्रश्न सोडवावे लागतात. यात उत्तम कामगिरी करणारे विद्यार्थी हे त्या विषयातील जगभरातील सर्वोत्तम विद्यार्थी मानले जातात. या स्पर्धेची रचना त्या त्या विषयानुसार बदलते. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविले जाते.

२] या स्पर्धेसाठी भारतीय विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया कशी होते?

ऑलिम्पियाड मध्ये वयोगटानुसार इयत्ता दहावी खालील आणि बारावी खालील असे विद्यार्थ्यांचे दोन गट आहेत. भारतीय विद्यार्थ्यांसाठी या दोन्ही गटाकरिता चार पाच टप्प्यांची

**साप्ताहिक संवाद**

निवड प्रक्रिया असते. प्रत्येक टप्प्यावर या विद्यार्थ्यांना कठीण परीक्षा द्यावी लागते. तसेच अंतिम टप्प्याआधी प्रशिक्षण शिबिरात सखोल मार्गदर्शन मिळते. त्यातून निवड होऊन हा संघ देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी यजमान देशाकडे रवाना होतो.



इंडियन असोशिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स,होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एजुकेशन,टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेंटर,कौन्सिल ऑफ सायन्स म्युझिअम या सारख्या संस्था भारतातील सर्व प्रवेश प्रक्रिया आणि परीक्षांचे काम पाहतात.

**लोकरंग**

३]या ऑलिम्पियाड स्पर्धेचे विद्यार्थ्यांना काय फायदे होतात?

ऑलिम्पियाड स्पर्धेत विचारपूर्वक आणि सखोल प्रश्न विचारतात,ज्यामुळे विद्यार्थ्यांची विषयाची समज वाढते. या परीक्षा विद्यर्थ्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीला धार देतात आणि समस्या सोडविण्याचे कौशल्य विकसित करतात. जेईई, नीट, sat अशा स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेली तयारी आणि मानसिकता यामुळे तयार होते. यशस्वी विद्यार्थ्यांना पदके, प्रशस्तीपत्र आणि शिष्यवृत्ती देखील मिळू शकते. ऑलिम्पियाड यामधील यश हे विद्यार्थ्यंच्या बायोडेटा मध्ये महत्वपूर्ण यश ठरते.

## यूटीटी सीझन 6 लिलावात दिया चितळे ठरली सर्वोच्च बोली लावलेली भारतीय खेळाडू



सीझन ३ चे विजेते चेन्नई लायन्सने इंडियनऑइल अल्टिमेट टेबल टेनिस (UTT) लिलावात चिनी खेळाडू फॅन सिकीला 19.7 लाख टोकन्स खर्चून सर्वाधिक महाग खेळाडू बनवले. UTT मध्ये प्रथमच खेळाडूंचा लिलाव होत असताना, भारताची अव्वल राष्ट्रीय खेळाडू दिया चितळे ही सर्वाधिक किंमतीची भारतीय खेळाडू ठरली. ती

**क्रीडांगण**

दबंग दिल्ली टीटीसीकडे तीव्र बोली युद्धानंतर राइट टू मॅच (आरटीएम) कार्डद्वारे 14.1 लाख टोकन्सच्या किंमतीने परतली.

गतविजेते गोवा चॅलेंजर्सने दुहेरी विजेतेपद मिळवणारे कर्णधार हरमीत देसाई यांना आरटीएमद्वारे 14 लाख टोकन्सच्या बोलीने पुन्हा करारबद्ध केले, जो त्याच्या मूळ किंमतीच्या दुप्पट आहे. सीझन २ चे विजेते दबंग दिल्ली टीटीसीने साथियन ग्यानसेकरनला 10 लाख टोकन्सच्या यशस्वी बोलीने परत आणले, ज्यामुळे ते सहा हंगामांत एकाच संघासोबत राहणारे एकमेव खेळाडू ठरले. श्रीजा आकुला जयपूर पॅट्रियट्सकडे 11 लाख टोकन्स (आरटीएम) मध्ये परतली, तर अहमदाबाद एसजी पायपर्सने मणिका बत्रासाठी 12 लाख टोकन्सच्या यशस्वी बोलीने खरेदी केले. तरुण खेळाडू अंकुर भट्टाचार्जी आणि पायस जैन यांना अनुक्रमे कोलकाता थंडरब्लेड्स आणि चेन्नई लायन्सने 11.4 आणि 11.6 लाख टोकन्समध्ये खरेदी केले. सर्व आठ फ्रँचायझींनी आगामी हंगामासाठी रणनीतिक खेळाडू निवडी केल्या.नीरज बजाज आणि विता दानी यांच्या सह-प्रमोशनखाली आणि टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडियाच्या छत्रछायेखाली आयोजित या फ्रँचायझी-आधारित लीगचे आयोजन २९ मे ते १५ जून दरम्यान अहमदाबादच्या एका अरेनामध्ये होणार आहे. लिलावाबाबत बोलताना विता दानी म्हणाल्या, "लिलावाने संघांना त्यांच्या पथकाची रचना करण्याच्या दृष्टिकोनातून नवीन संधी दिली आहे. अनुभवी आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि युवा भारतीय प्रतिभांना समान लक्ष देणे उत्साहवर्धक होते. हा समतोल इंडियनऑइल यूटीटीने भारतीय टेबल टेनिसच्या परिसंस्थेवर कसा प्रभाव टाकला आहे हे दर्शवतो.''

# नैसर्गिक अनुभूतीचे शहर अमरावती



चिखलदराच्या खोल ओसर खोऱ्यात प्रत्येक बाजूला नवीन सावली आहे. चिखलदरा हे अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. आणि हे हिल स्टेशन आपल्याला वन्यजीव, भूप्रदेश, तलाव आणि धबधबे यांचा भरभराटपणा प्रदान करते. चिखलदऱ्याजवळ अनेक प्रेक्षणीय पर्यटन स्थळे आहेत. त्याचे नाव किचका असे ठेवले गेले आहे. पांडुपुत्र भिमाने किचकाची हत्या केली आणि त्याला खोऱ्यात फेकले. अशा प्रकारे हे "किचकदरा" म्हणून ओळखले जाऊ लागले आणि हळूहळू ते "चिखलदरा" मध्ये बदलले. चिखलदरा खोल दऱ्यांनी परिपूर्ण आहे आणि या दऱ्या मखमली गवत, धुके आणि भव्य वृक्षांनी परिपूर्ण आहेत. चिखलदरा हे १,११८ मीटर उंचीवर वसलेले आहे आणि महाराष्ट्रातील एकमेव कॉफी उत्पादक प्रदेश असल्याने त्याला वेगळेपण आहे. या सर्व उपलब्धींमुळे ते उन्हाळ्याचे अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. निसर्गसंपन्न, विलक्षण वन्यजीव, चित्तथरारक धबधबे आणि सरोवर असलेल्या चिखलदऱ्याचे सौंदर्य विलोभनीय आहे.

**चला पर्यटनाला**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कैलास मानसरोवर यात्रा लवकरच पुन्हा सुरु होणार

**नवी दिल्ली, दि. १८ वृत्तसंस्ता**

कैलास मानसरोवर यात्रा लवकरच जनतेसाठी पुन्हा सुरू होऊ शकते, अशी घोषणा परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी केली, जी भारत-चीन संबंधांमध्ये मोठी प्रगती होत असल्याचे दर्शवते.



कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे २०२० पासून स्थगित असलेली कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्याची शक्यता परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केली आहे. ज्यामुळे भारत-चीन संबंध सुधारल्याचे संकेत मिळत आहेत. दोन्ही देशांनी आवश्यक व्यवस्थांवर काम करणाऱ्या तांत्रिक पथकांसह थेट विमान वाहतूक सेवा पुन्हा सुरू करण्यास तत्वतः सहमती दर्शविली आहे. सीमापार सहकार्य आणि देवाणघेवाण गतिमान करण्यासाठी चर्चा सुरू आहे.

"आम्ही लवकरच कैलास मानसरोवर यात्रेबाबत जनतेसाठी सूचना जारी करू. लवकरच यात्रा पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे," असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले. दोन्ही देशांमधील लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी आणखी एक उपाय म्हणजे थेट उड्डाणे पुन्हा सुरू करण्याबाबत ते म्हणाले, "तत्त्वतः, दोन्ही देशांनी उड्डाणे पुन्हा सुरू करण्यावर सहमती दर्शविली आहे. दोन्ही बाजूंचे तांत्रिक पथक उड्डाण सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी तांत्रिक व्यवस्था तपासत आहेत. दोन्ही नागरी विमान वाहतूक अधिकाऱ्यांनी भेट घेतली आहे.

जानेवारीमध्ये, भारत आणि चीनने यात्रा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता आणि थेट उड्डाणे सुरू करण्यासाठी तत्वतः सहमती दर्शविली होती. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी बीजिंगमध्ये चीनचे उप परराष्ट्र मंत्री सन वेइडोंग यांच्याशी चर्चा केल्यानंतर हे निर्णय जाहीर करण्यात आले. मार्चमध्ये त्यांनी दोंन्ही देशांमधील संबंध दृढ करण्यासाठी सीमापार नद्या आणि कैलास मानसरोवर यात्रा यासह सीमापार सहकार्य आणि देवाणघेवाण पुन्हा सुरू करण्याची प्रक्रिया वेगवान केली. गेल्या महिन्यात बीजिंगमध्ये भारत-चीन सीमा व्यवहारांवरील सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्य यंत्रणेच्या ३३ व्या बैठकीचा भाग म्हणून ही चर्चा झाली. मार्चमध्ये झालेल्या बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व सहसचिव (पूर्व आशिया) गौरंगलाल दास यांनी केले आणि चिनी शिष्टमंडळाचे नेतृत्व चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सीमा आणि महासागरीय व्यवहार विभागाचे महासंचालक हॉंग लियांग यांनी केले.

# 'जाट' चित्रपट वादाच्या भोवऱ्यात, सनी देओल - टीमवर गुन्हा दाखल

**जालंधर, दि. १८ वृत्तसंस्था**

अभिनेता सनी देओल आणि रणदीप हुड्डा यांची मुख्य भूमिका असलेला 'जाट' चित्रपट १० एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित झाला. प्रदर्शित होताच त्याने प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण केली. 'गदर २' नंतर अभिनेता सनी देओल पुन्हा एकदा ॲक्शन अवतारात प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. मात्र काही दिवसातच 'जाट' हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. जाट चित्रपटाच्या संपूर्ण टीमवरच आता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



'जाट' चित्रपटातील एका दृश्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याबद्दल बॉलिवूड अभिनेता सनी देओल, रणदीप हुड्डा, विनीत कुमार सिंह, दिग्दर्शक गोपीचंद मालिनेनी आणि निर्माता नवीन येरनेनी यांच्याविरुद्ध पंजाबमधी जालंधरच्या सदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

'जाट' चित्रपटात प्रभु येशू ख्रिस्ताचा अपमान केल्याच्या आरोपावरून ख्रिश्चन समुदायाच्या सदस्यांनी पोलिस आयुक्त कार्यालयाबाहेर निदर्शने केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांनी गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे निवेदनही सादर केले. पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत तक्रारदाराने आरोप केला आहे की, "'जाट' चित्रपटातील क्रूसावर चढवण्याच्या दृश्यात प्रभु येशू ख्रिस्ताची नक्कल केली जाते आणि त्याची खिल्ली उडवली जाते, ज्यामुळे ख्रिश्चन समुदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात", असे म्हटले आहे.

'जाट' चित्रपटात प्रभु येशू ख्रिस्ताचा अपमान केल्याच्या आरोपावरून ख्रिश्चन समुदायाच्या सदस्यांनी पोलिस आयुक्त कार्यालयाबाहेर निदर्शने केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांनी गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे निवेदनही सादर केले. पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत तक्रारदाराने आरोप केला आहे की, "'जाट' चित्रपटातील क्रूसावर चढवण्याच्या दृश्यात प्रभु येशू ख्रिस्ताची नक्कल केली जाते आणि त्याची खिल्ली उडवली जाते, ज्यामुळे ख्रिश्चन समुदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात", असे म्हटले आहे.

चित्रपटातील दृश्यात मुख्य खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता रणदीप हुड्डा एका चर्चमध्ये पवित्र व्यासपीठाच्या वर असलेल्या क्रूसाखाली उभा आहे. तर इतर सदस्य प्रार्थना करताना दिसत आहेत. त्यात चर्चमध्ये गुंडगिरी आणि धमकीचे चित्रीकरण देखील आहे, जे समुदायाला अत्यंत आक्षेपार्ह वाटले आहे. यापूर्वी, ख्रिश्चन समुदायाच्या सदस्यांनी या दृश्यावर आक्षेप घेतला होता आणि चित्रपटावर बंदी घालण्याची धमकी दिली होती. त्यापैकी अनेकांनी जाट चित्रपटातील "हे दृश्य चर्चच्या सर्वात पवित्र जागेचे - व्यासपीठाचे अपवित्रीकरण आहे", असे देखील म्हटले होते.

महासागर NASHIK
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com